पहिले अखिल भारतीय

मुस्लिम मराठी

साहित्य संमेलन

१९९० सोलापूर

स्मरणिका

SAYYED IQBAL

स्मरणिका संपादक समिती

प्रा. फकरुद्दीन ह. बेन्नूर

प्रा. अजीज नदाफ

ए. के. शेख

डॉ. इक्बाल मिन्ने

प्रा.मीर इसहाक शेख

मुबारक शेख

अंजूम मोमीन

मुद्रक --

म. अय्युब अ. नल्लामंदू

" कमर प्रिंटर्स "

५४६, साखर पेठ, सोलापूर.

प्रकाशक--

कार्याध्यक्ष अ. भा. मुस्लीम मराठी

साहित्य परिषद सोलापूर.

मुखपृष्ठ

सय्यद इक्बाल

(KNOW ME GRAFICS)

F. H. Benna
personal copy

संपादकीय –

मराठी भाषेला मुस्लिमांचे योगदान

मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना आणि सोलापूरातील पहिले अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन ही केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर, भारतातील मुस्लिम समाजाच्या सामाजिक – सांस्कृतिक जीवनातील एक महत्त्वाची घटना आहे त्या संबंधाने नोंदविल्या गेलेल्या प्रतिक्रिया देखील अपेक्षितच होत्या महाराष्ट्र ही रा. स्व. संघ, हिन्दुमहासभा या सारख्या हिंदुत्ववादी फॅसिस्ट संघटनाची जन्मभूमी आणि कर्मभूमी असल्याने महाराष्ट्रात जेवढया मोठया प्रमाणांत मुस्लिम इतिहासाचे आणि संस्कृतीचे विकृतीकरण झालेले आहे,तेवढे अन्यत्र आढळत नाही किंबहुना मुस्लिम समाजाचे सामाजिक सांस्कृतिक साहित्यिक आणि राष्ट्रवादी योगदान पूर्णपणे नाकारून मुस्लिमांचा इस्लाम धर्म हा भारताबाहेरील असल्याने मुसलमांनाचे भारतातील अस्तित्वच संशयास्पद आणि राष्ट्रविरोधी आहे असा सिद्धांत मांडणाऱ्यांची महाराष्ट्र ही जन्म भूमी असल्याने आमच्या साहित्य संमेलनासंबंधी तीव्र प्रतिक्रिया निर्माण होणें साहजिकच होते मुस्लिम मराठी साहित्य संमेलन का ? मराठी मुस्लिम साहित्य संमेलन असे नांव कां दिले नाही, इथपासून तर या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने मुसलमानांचा अलगतावाद किंवा फुटीरवाद हा स्पष्टपणें सिध्द होतो किंवा मराठी साहित्याला निर्माण झालेला हा 'हिरवा' धोका आहे किंवा मुस्लिमांचे 'मराठी' साहित्य संमेलन म्हणजे काही तरी भयंकर 'राष्ट्रद्रोही' प्रकार आहे इथपर्यंत, विविध प्रकारच्या प्रतिक्रिया नोंदविल्या गेल्या पहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेल्या प्रा. फ. म. शहाजिंदे यांना कविता, कादंबरी, आणि दीर्घ काव्य या प्रकाराबद्दल राज्य पातळीवरील पारितोषिके मिळालेली असताना देखील, हे कोण शहाजिंदे! आम्ही तर यांच नाव प्रथमच ऐकत आहोत, इथ पासून तर, या साहित्य संमेलनात खरोखरच किती मराठी जाणणारे व लेखन करणारे जमले होते, इथपर्यंत, सर्व प्रकारच्या मल्लीनाथाथ्या करून झाल्या.

या पहिल्या साहित्य संमेलनाची स्मरणिका प्रकाशित होण्यास जसा अनेक अडचणी मुळे विलंब झाला, तसेच झालेल्या या विलंबामुळे त्या संबंधी प्रतिक्रियांची नोंद घेणेंही शक्य झालें मराठीतून लेखन करणाऱ्या मुस्लिम साहित्यकांची अलग चूल मांडण्यासाठी या मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची किंवा साहित्य संमेलनाची कल्पना मांडली गेलेली नाही किंवा आम्ही उर्दु या तथाकथित 'अराष्ट्रीय' भाषेत लेखन न करता मराठीतून लेखन करणारे किती 'राष्ट्रीय' आहीत हे दर्शविण्यासाठी हे संमेलन नव्हते तसेच आम्ही भारताच्या 'राष्ट्रीय' प्रवाहांत कसे आहोत, हे सिद्ध करण्यासाठी देखील या साहित्य संमेल–

नाचे प्रयोजन नव्हते !

भारतात ब्रिटिशांच्या आगमानानंतर सुरु झालेल्या जमातवादी राजकारणामुळे आणि १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून उदयास आलेल्या वरिष्ठ वर्गीय – वर्णीय – जातीय राजकारणामुळे भारतातील सर्वच तळागळांतील जाती–जमाती आणि अल्पसंख्याक यांचे सर्व प्रकारचे योगदान नाकारलें गेले वास्तविक भारतीय संस्कृतित,तळागाळांतील जातीजमाती भटके, विमुक्त आदिवासी आणि अल्पसंख्य जमाती यांचे योगदान सर्वात महत्वाचे आहे किंबहुना भारतातील कला तंत्रज्ञान, साहित्य आणि अभिजात ज्ञान यांच्या निर्मिती आणि विकासात, या जाती – जमातीनी फार मोठी कामगिरी बजावली आहे मराठी भाषेच्या आणि संस्कृतीच्या उदयापासूनच मुसलमानांनी मराठी भाषेच्या आणि संस्कृतिच्या विकासाला हातभार लावलेंला आहे मराठी साहित्याची सर्वसाधरणपणे अकराव्या शतकापासून सुरुवात झालेली दिसते अगदी त्या काळापासूनच महाराष्ट्रात आलेल्या सूफी संतांनी इथल्या प्रादेशिक बोलीभाषेच्या अभ्यास करुन त्याचा वापर करण्यास सुरुवात केल्याचे दिसून येते किंबहुना मुस्लिम सूफी संतानी निर्माण केलेली दखनी उर्दु ही मराठमोळया बोली भाषेच्या अंगानेच वाढली दखनी उर्दू ही उर्दूची बोली भाषा कां मराठीची बोलीभाषा असा वाद निर्माण होण्याइतपत त्याचे मराठीशी साम्य आहे मुस्लिम संतकवींनीं मराठी भाषेत दखनी बोली, उर्दू फारशी या मधील शब्द संपत्तीच्या वापर करुन मराठी भाषेच्या विकासाला हातभार जसा लावला, तसेच समता, एकेश्वराचा सिद्धांत, जातीभेद–धर्मभेद विरोध, हे विचार ही मराठी सारस्वतांत रुजविले तेराव्या आणि चौदाव्या शतकात धार्मिक समन्वयवादाचा पुरस्कार केला समान विचारधारेमुळेच मुस्लिम आणि हिंदू सन्तकवींचा मानवतावाद समांतर पणें विकसित होताना आपणास जाणवतो गायनांचे प्रकार, शायरीचे तंत्र, शोकगिते, स्फूर्तीगिते आणि भक्ती गीते या परंपरावर मुस्लिम संतकवीच्या खानकाएंच (मठांचा) प्रभाव स्पष्टपणें जाणवतो तेराव्या शतकापासून तर मुस्लिम कवी मराठीचा सर्रास वापर करताना दिसतात गुरुपरंपरेपासून ते भाषेच्या मांडणीपर्यंत त्यांचा प्रभाव जाणवतो संत–काव्यापासून ते शाहीरी काव्य पर्यंत अध्यात्मापासून ते बलुतेदारीतील कामापर्यंत महाराष्ट्राचा मुसलमान जसा मराठी मातीतच वाढला, तसा मराठमोळया संस्कृतीला त्याने आपल्या परीने हातभारही लावला परतू हा सर्व सांस्कृतीक वारसा उपेक्षिला गेला मराठी साहित्यात याची दखल ही घेतली नाही किंबहूना आधुनिक मराठी साहित्यकांनी मराठी मातीचा आणि संस्कृतीचा भाग असलेल्या मुसलमानांचे विकृत चित्रणच साहित्यात केले त्यांच्या मराठीपणाची दखल घेणें तर दूरच राहिले, परंतू त्याला 'अराष्ट्रीय' समजण्यात धन्यता मानले साहित्य संमेलनापासून साहित्य संमेलने होत राहिली परंतू मुस्लिमांनी केलेंल्या मराठी साहित्याची सेवा पूर्णपणे उपेक्षिली गेली सोलापूरचे मुस्लिम मराठी साहित्य संमेलन झाल्यानंतर १९९० मध्ये रत्नागिरीला झालेंल्या मराठी साहित्य संमेलनात मुस्लिज मराठी साहित्य परिषदेच्या प्रमुख पदाधिकाऱ्याना आमंत्रण वा. अशी पत्रे लिहून देखील त्याना बोलविले गेलें नाही स्वतःहून रत्नागिरीला

मनोगत...

चार-पांच वर्षांपूर्वी प्रा. बेन्नूर यांच्याकडे सहज चर्चा करीत असताना "मुस्लिम मराठी साहित्यकां" वर एखादा लेख लिहिण्यासाठी मुस्लिम मराठी साहित्यिकांचे पत्ते कसे मिळवावेत यावर विचार केला होता दरम्यान सोलापूरला दलित साहित्य संमेलन व दलित नाट्य संमेलन झाले त्यातून स्फूर्ती घेऊन २३ जानेवरी १९९० रोजी मुस्लिम मराठी साहित्य संमेलन घेण्याबाबत मी पहिले निवेदन प्रसिद्ध केले. नंतर श्री. अ. लतीफ नल्लामन्दू, प्रा. बेन्नूर, प्रा. मीर इस्हाक शेख, मुबारक शेख, अन्जूम मोमीन, इस्हाक मनियार, बी. एच. करजगी, एस. ए. इरफान, रफिक अडतें, प्रा. नसीम मन्नान यांची एक निमंत्रक समिती निवडली गेली मला पैशाची अडचण निर्माण झाली. यातून श्री नल्लामन्दू यांनी मार्ग काढला सुरुवातीची संपूर्ण आर्थिक जबाबदारी त्यांनी अंगावर घेतली

वृत्तपत्रांतील बातम्यामुळे लेखकांच्या पत्रांचा पाऊस पडू लागला उत्तरे देता देता नाकी नऊ आले पण २४ व २५ मार्च १९९० हे दोन दिवस मराठी साहित्येतिहासात क्रांतीकारी ठरले. गुजरात, गोवा, कर्नाटक इत्यादि राज्यांतून व महाराष्ट्रातून २०० प्रतिनिधी हजर झाले याच संमेलनात 'अ. भा मुस्लिम मराठी साहित्य परिषद'च्या स्थापनेची घोषणा झाली रीतसर ही संस्था रजिस्टर झाली.

पहिल्या संमेलनासाठी मा. शरदराव पवार मुख्यमंत्री, यांनी दहा हजार रुपये अनुदान पाठविले तर मा. सुशिलकुमार शिन्दे, नगरविकास मंत्री यांनी पाच हजाराची वैयक्तिक देणगी दिली तर सोलापूर महानगर पालिकेनें पंधराहजार रूपयांची देणगी दिली. शाहीर विश्वासराव फाटे यांनी ३ हजारांच्या व शेख महेताब हाजी शेखलाल (बंबई) यांनी २ हजारांच्या जाहिराती मिळवून दिल्या. सोलापूरात इतर देणग्यां द्वारे पंधरा हजार रुपये जमा झाले तसेच मा. रंगा अण्णा वैद्य, एम. डी. शेख, एम सी. शेख, गुलजारचे मुस्तफा पटेल, बख्तीयार टंगसाल, बशीर परवाज, आर्ट ॲकेडमीचे राजा बागबान, स्टूडंट फेडरेशन चे हसीब नदाफ, संजय जोगीपेठकर, परवाज युथचे एजाज हुसेन सेडमवाले व त्यांचे सहकारी जिल्हा प्रसिध्दीधिकारी युनूस आलम सिद्दीकी, इंडियन युथचे फारुक गुलामनबी, अस्लम सय्यद अय्यूब नल्लामन्दू, मजहर अल्लोळी, इप्टाचे साहीर नदाफ व त्यांचे सहकारी या सर्वांच्या सहकार्यातून हे संमेलन यशस्वी झाले.

गेलेल्या मुस्लिम मराठी साहित्यिकांना संधी दिली गेली नांही त्याबाबतींत रत्नागिरीच्या वर्तमानपत्रातून चर्चा झाली.

तेव्हां मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना या उपेक्षेच्या परिणामा पासून झालेली आहे मराठीतून लेखन करणाऱ्या मुस्लिम लेखकांच्या अभिव्यक्तीसाठी आणि विचार आणि भाषेच्या समर्थनासाठी आपल्या हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी या परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे मराठी साहित्याला आणि संस्कृतीला मुस्लि-मांनी केलेले योगदान मांडणें हे जसे त्याचे उद्दिष्ट आहे तसेच गेल्या दोन दशकांतील प्रचंड सामाजिक, राजकीय, - आर्थिक, संक्रमणामुळे मुस्लिम समाजावर जे परिणाम होत आहेत, जी वैचारिक भावनिक कोंडी होत आहे ते शब्दांतून व्यक्त होण्यास साहित्याच्या चळ-वळींची गरज आहे त्याची सुरुवात आम्ही पहिले मुस्लिम मराठी साहित्य संमेलन घेऊन झाली आहे.

निराकाराच्या भक्तीला आकार हवा असतो, अस्तित्त्वाला अर्थ हवा असतो, समाज जीवनांतील स्थित्यतरें, आंदोलने आणि वेद-नांना शब्द हवे असतात शब्द हे साहित्यिकांची वाट पहात असतात आणि साहित्यिकांना व्यासपीठ पाहिजे असते साहित्याच्या माध्य-मातून व्यक्त होणारी भाषाच संस्कृती निर्माण करीत असते आणि मानवतेच्या साक्षात्कार घडवित असते याच जाणीवेतून आम्ही सुरू केली आहे आमचीं साहित्यिक चळवळ !

प्रा. फ. ह. बेन्नूर

संपादक

स्मरणिकेला जो उशीर होत आहे त्याचे कारण लेख जमा होण्यास विलंब झाला तसेच उपरोक्त देणग्या संमेलनानंतर प्राप्त झाल्या हे होय.

या 'स्मरणिके' साठी डॉ. एम. ओ. शेख' सुरेश भट्ट, मुबारक शेख, सय्यद अलाऊद्दीन, आनंद कुंभार, प्रा. डॉ. नी. त्र्यं. पुंडे, अंजूम मोमीन, अल नासिर काझी, मो. इस्हाक मणि–यार, प्रा. मीर इस्हाक शेख, विलास म्हात्रे यांनी लेख लिहून दिले तसेच अजीज हसन मुकरी, प्रा. सौ. फातिमा मुजावर, शफी शहदवी, पठाण हमीदुल्ला खान, तांबोळी एच. बी; दस्तगीर राज, सुधाकर पोतदार यांनी आपल्या कविता, गझला पाठवून दिल्यात त्या बद्दल 'संपादक मंडळ' त्यांचे आभार मानत आहे.

'कमर प्रिंटर्स' चे संचालक मो. अय्युब नल्लामन्दू व त्यांचा कर्मचारी वर्ग, 'नो मी ग्राफिक्स' चे सय्यद इक्बाल या सर्वांचे आभार मानतो. हा प्रथम प्रयास आपण गोड मानून घ्यावा ही विनंती.

"मैं अकेला ही चला था, जानीबे मंझील मगर
लोग साथ आते गये और कारवां बनता गया"

प्रा. अजीज नदाफ

कार्यकारी संपादक



अ. भा. मुस्लिम मराठी साहित्य परिषद
सोलापूरच्या पहिल्या संमेलनानिमित्त प्रकाशित
होणाऱ्या

स्मरणिकेच्या

अंतरंगात आपण प्रवेश करीत आहात

आपले मनःपूर्वक स्वागत !

प्रा. फ. म. बेन्नूर	प्रा. अजीज नदाफ	अ. लतीफ नल्लामंदू
कार्याध्यक्ष	सचिव	खजीनदार

अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद सोलापूर

यांचे कडून सदिच्छापूर्वक भेट.

ईशस्तवन




तव शुभ नावे आरंभियले अल्लाह दयाघना
तूचि दयेचा सागर दे तू सन्मति सर्वजना ।
पालनकर्ता तू सृष्टिचा निर्माता निर्गुणा
स्तवन तुझेचि कां न करावे त्यजुनि सर्वगणा ।
बहु दयाळू बहु कृपाळू मन डोले स्तवना
अंतिम न्याय–दिनाचा स्वामी शरणम् तुजवंदना ।
तुझीच भक्ति करतो आम्ही मदतीची याचना
दाखिव आम्हा सरळ मार्ग हीच असे प्रार्थना ।
मार्ग सुमंगल, सफल व्हावया, दावी तू सज्जना
नकोच दाखू प्रकोपितांचा आवडे जो दुर्जना ।

(अल–फातिहा आधारे)

डॉ. एम. ओ. शेख (अन्जुम)

संपादक सा. 'शोधन' बंबई.



नात शरीफ

अखेरचा आसरा मुहम्मद [स.]

उजाड वैराण वाळवंटी खळाळणारा झरा मुहंमद
जगातल्या दीन दु:खितांचा अखेरचा आसरा मुहंमद
आताच डोळे पुसून झाले आताच मी लागलो हंसाया
आताच हा भेटला जिवाचा सखा मला हासरा मुहंमद
खरेच तू चंद्र अमृताचा खरेच तू सूर्य जीवनाचा
दिशादिशाना प्रकाशणारा दिसे तुझा चेहरा मुहंमद
तुझ्या घराची तऱ्हाच न्यारी समान श्रीमंत वा भिकारी
तुझ्या घरी दे आता मलाही लहानसा कोपरा मुहंमद
जसे तुझे नाव घेतले मी तुझ्या दयेचा सुगंध आला
अजूनही अंतरात माझ्या, फुले तुझा मोगरा मुहंमद
भलेबुरे पाहिले किती मी किती खरे अन कितीक खोटे
भल्यात माझां भला मुहंमद, खऱ्यात माझा खरा मुहंमद

सुरेश भट

आदरणीय श्री. नदाफ यांस स. न.

अ. भा. मुस्लीम मराठी साहित्य सम्मेलनाचे निमंत्रण आपण अगत्याने पाठविल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

मराठी साहित्याचे दालन विशाल आहे व त्यात निरनिराळे सामाजिक घटक एका मागून एक, आपला अनुभव घेऊन व निर्मिती घेऊन प्रवेश करना हेच व त्याचा आपुलकीने स्विकार, स्वागत व गौरव होत आहे. दलित साहित्याने तर आपल्या समाज जीवनाचे दु:ख अनुभव, कारुण्य विजादु व अवहेलनाचे विदारक चित्र मराठी समाजा समोर मांडून व त्या विरूद्ध अक्रोश प्रकट करून एक अनोखा इतिहास घडविला आहे.

होऊ घातलेले पहिले मुस्लिम मराठी साहित्य सम्मेलन याच परंपरेचा एक भाग आहे. आजच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक घडणीत मुस्लीम समाजाचा वाटा मोठा आहे. या प्रदेशातील हस्तोद्योग, कला दुसरा स्थापत्य, नगररचना सारख्या विविध क्षेत्रात त्यांनी आपल्या अस्तित्वाचा व अभिरुचीचा ठसा उमटविलेल्या आहे. साहित्य क्षेत्रातील त्यांचे योगदान संकलित व संघटित स्वरुपात मांडण्याची गरज होती. आपले अधिवेशन ते महत्वाचे काय वरील व या भागात राहणाऱ्या मुस्लिम समाजाचे अनुभव. त्याच्या कारुण्याचा व आनंदाच्या छटा शब्दा द्वारे साकार करण्यास प्रेरणा देईल व राष्ट्रीय एकात्मतेच्या महाप्रवाहात आपला प्रवाह मिसळून त्यास समृद्ध करील असा विश्वास आहे.

प्रकृती कारणाने मी येऊ शकणार नाही याचा खेद वाटतो. अधिवेशनास सुयश चिंततो.

आपला

चंद्रगुप्त चौधरी (प्रमुख कार्यवाह)

अ. भा. शांतता व मातृभाव संघटना **औरंगाबाद**

सप्रेम नमस्कार वि. वि.

पहिल्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे निमंत्रण पोचले. संमेलन सपूर्ण यशस्वी होईलच. मराठी साहित्य महामंडळातर्फे संमेलनास हार्दिक शुभेच्छा.

आपला

राजेंद्र बनहट्टी

अध्यक्ष अ. भा. मराठी साहित्य महामंडळ **पुणें**

शुभ - संदेश

kalimajeem.blogspot.in

कलीम मोकासे वापी (गुजराथ)

सोलापूर येथे, दि. २४ आणि २५ मार्च रोजी, पहिले अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन भरत असल्याचे वाचून फार आनंद वाटला. अशा आगळया संमेलनाला, नामवंत साहित्यिक प्रा. फ. म. शहाजिंदे सारखे अध्यक्ष लाभले, अभिनदन !

गेले कित्येक दिवसापासून, ''मराठी साहित्यात मुस्लिम लेखकांचे योगदान'' या विषयावर लिहायचा संकल्प आहे. त्या दृष्टिने अभ्यासात कांही अडचणीमुळे काम लांबणीवर पडले. मात्र अनेक मुस्लिम लेखक मित्रांचे पत्ते आणि परिचय, प्रा. फ. म. शहाजिंदे यांच्या सहकार्यांने मिळाले.

या कामी, मुख्य अडचण वेळेवर साहित्य उपलब्ध होत नाही. आणि पुष्कळशी प्रकाशने सहजी विकत घेणे शक्य होत नाही. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा, महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्रा बाहेर असलेल्या, मराठी मुस्लिम साहित्यिक व रसिकांना उजेडात येण्याच्या दृष्टिने हा उपक्रम स्तुत्य आहे.

मुसलमान कवी / लेखकांनी मराठीत निश्चितच खूप काही लिहलंय, आजही अनेक साहित्यिक त्याच योगदान देत आहेत, मात्र लेखनाचे प्रमाण फारच त्रोटक वाटते किंवा सर्वापर्यंत पोह्चत नाही.

मुस्लिम समाजातील अनेक अडचणी, उणिवावर प्रकाश पडणे आवश्यक आहे, त्यासाठी सामाजिक संस्था कार्य करताहेत परंतु साहित्यात ती प्रखरता फार दिसत नाही अशी समर्थ लेखणी असलेले साहित्यिक आहेत ही मात्र साहित्याद्वारे पूर्ण पणे मुखर नाहीत


या अशा संमेलनात, एकंदर साहित्याचा आढावा घेणे आणि नवीन साहित्यिकांना संमेलना द्वारे संधी उपब्ध करुन देणे ही बाब स्वागतार्हच ! या संमेलनाचे दुसरे उद्देश, जशे पत्रकात नमूद आहे. मराठीत मुस्लिम साहित्याचा जो प्रवाह अंधारात प्रसिद्ध परा : डमुख झाला आहे, त्यास प्रकाशात आणणे व त्यास याबाबत सहकार्य करणे, ही बाब स्तुत्य ! संमेलनाच्या संयोजनाबद्दल अनेकानेक शुभेच्छा. ०००

WISHING ALL SUCCESS TO THE FIRST ALL INDIA MUSLIM MARATHI LITERARY MEET AT SOLAPUR LETTER FOLLER FOLLOWS

Principal Dr. A. A. Munshi Maharashtra.
College Bombay.

मुस्लिम मराठी साहित्य संमेलन

सोलापूर मार्च १९९०



स्वागताध्यक्षीय भाषण.

मा. श्री. धर्मण्णा मों. सादूल

खासदार व महापौर सो. म. पा.

मुस्लिम – मराठी – साहित्यिक आणि साहित्य – प्रेमी बंधु भगिनीनो !

आज आपण पहिल्या मुस्लिम – मराठी साहित्य संमेलनानिमित्त येथे बहुसंख्येने उपस्थित झालात, त्याबद्दल शहराचा प्रथम नागरिक म्हणून आणि संमेलनाचा स्वागताध्यक्ष म्हणून मी आपले स्वागत करतो.

सोलापुरातील चार हुतात्मे म्हणजे स्वातंत्र्य लढ्यातील राष्ट्रीय – एकात्मतेचे प्रतीक होय. हुतात्मा मल्लपा धनशट्टी हे लिंगायत होते तर जगन्नाथ शिंदे हे मराठा होते, सारडा हे मारवाडी होते तर कुर्बान हुसेन हे मुसलमान होते, विशेष म्हणजे कुर्बान हुसेन हे झुंजार कामगार नेते आणि पत्रकार होते. अवघ्या २४ व्या वर्षी ते स्वातंत्र्यासाठी फांसावर चढले, अशा या कुर्बान हुसेन नगरात हे अधिवेशन भरत आहे. आणि दोन दिवस आपण महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील मुस्लिम साहित्यिकांनी मराठी भाषेची जी सेवा केली आहे व सध्या करीत आहात त्याबाबत एकमेकांच्या विचाराने सुसंवादी वातावरण निर्मितीच्या माध्यमातून आपण बोलणार आहोत. एकमेकांना समजावून घेऊन महाराष्ट्राच्या व देशाच्या एकात्मतेसाठी पुढील पाऊल उचलणार आहोत व हा योग निश्चित साहित्य कला व सामाजिक बांधिलकी मध्ये दुर्मीळ असाच आहे.

सोलापूर हे गिरणगांव असले तरी येथील सिद्धेश्वर मंदिर, शहेनशहा शाहजहुर यांचा दर्गा, एतिहासिक आदिलशाही किल्ला आहे शिवाय इथले शैक्षणिक वातावरण आता २१ व्या शतकाकड धाव घेत आहे. हे मनोमनी सिंहावलोकन केल्यासही सर्वांना जाणवेल. येथे काय नाही ? जे हवे ते सर्व काही आहे. साहित्यिकांची पंढरी येथे दुमदुमत आहे,

चौदाव्या शतकात बहमनी राज्याची स्थापना झाली आणि नंतर त्याचे विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा, बिदर आणि वऱ्हाड असे पाच तुकडे झाले, त्यापैकी विजापूर, अहमदनगर, बिदर, वऱ्हाड हे महाराष्ट्राच्या आसपासची राज्ये होती ही गोष्ट आपण लक्षात

घेतली पाहिजे, कारण आदिलशहाची महाराणी ही महाराष्ट्रीयन होती. इब्राहीम आदिलशहा हा मराठीचा कवी होता आणि त्याच्या ग्रंथाची सुरुवात "सरस्वती वंदना" ने झालेली आहे. तर दरबाराची भाषा 'मराठी' होती. एवढे या कलेच्या आम्ही तुम्ही सर्वजण जवळ आलो होतो व आहोत,

शिवकाळापूर्वीच इथल्या साधुसंतांनी भक्तीच्याद्वारे हिंदू – मुस्लिमांच्या आध्यात्मिक एकतेचा पाया घातला. येथून २५ किलोमिटर अंतरावर असलेल्या वडवळ येथील नागेश हे त्यांचे हिंदू व मुसलमान ह्या दोन्ही जमातीचे आध्यात्मिक गुरु होते तर आळंद, गुलबर्गा, गाणगापूर, विजापूर येथील थोर संतांची शिकवण ही एकेश्वर वादाची विद्यापीठे होती.

१६ व्या शतकात सोलापूर जिल्हयातील "लतीबशाह" हे थोर संतकवी होते. त्यांच्या विषयी महिपतीनी म्हटले आहे 'लतीबशाह मुसलमान / परमभाविक वैष्णवजन' स्वतः लतीबशाह म्हणतात "अता पूजा कोठे वाहु पाहता देहीच जाला देवू ॥" प्रसिद्ध कवी अलमखान, गरीब अब्दुल हे नाथपंथीय होते. म्हणजे मराठी बाणा या सर्वांनी आवर्जून जोपासलेला होता.

१८ व्या शतकात बार्शी तालुक्याचे सय्यद हसन, सय्यद मोहियुद्दीन आणि हुसेन नबी या शाहिरांनी आपल्या लावण्या – पवाड्यानी महाराष्ट्राला वेड लावले पण त्यांचे साहित्य आणि सविस्तर जीवन उपलब्ध नाही तसेच मंगळवेढ्यांचे शेख सलीम महंमद यांनी म्हटले आहे. "आम्ही जातीचे ब्राम्हण । आमचे सोयरे मुसलमान ।" अशा एकात्मतेला आज ग्रहण लागले आहे हे काम दर्शविणे "जे ज्याला भोवले ते त्याला साहले" हीच उक्ती सार्थ ठरते.

साऱ्या महाराष्ट्राला १९५७ च्या संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आपल्या पहाडी आवाजाने आणि लोककलेने वेड लावणारे शाहीर अमर शेख हे याच जिल्हयातील बार्शीचे रहिवासी होते आणि त्यांच्याबद्दल आम्हालाच नव्हे तर मराठी – सारस्वतालाच अभिमान आहे. इतकेच नव्हे तर अखिल भारतीय मराठी साहित्य समेलनांचे अध्यक्षपद सोलापूरला पहिल्यांदाच आमचे डॉ. यु. म. पठाण यांनी मिळवून, मराठी साहित्यात मानाचा शिरपेच खोवला आहे डॉ. प्राध्यापिका नसीमा पठाण यांनी उप – महापोर पद भुषवूनही मराठीत तीन उच्च दर्जाचे ग्रंथ लिहिलेले आहेत प. गुलाम दस्तगीर बिराजदार (अक्कलकोट) हे संस्कृत पंडित असून ख्यातनाम संस्कृत व्याख्याते आहेत. व या मराठीच्या क्षेत्रातील साहित्याच्या रचनेमध्ये विस्तृत प्रगल्भ होण्यासाठी फार मोठे कार्य ह्या सर्वांनी केले आहे.

प्रा. अजीज नदाफ हे सोलापूरच्या राजकीय, सामाजिक. सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर साहित्यिक कलावंत आणि विचारवंत आहेत. त्यांची पांच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. आणि या पहिल्या संमेलनाचे तेच निमंत्रक आहेत.

तसेच प्राध्यापक बेन्नूर हे मराठीतील थोर पुरोगामी विचारांचे लेखक आणि फडे वक्ते आहेत. प्रा. मिर इस्हाक शेख हे मराठी संस्कृत चे प्राध्यापक असून उत्तम कवी आहेत श्री. मुबारक शेख हे आजचे प्रसिध्द तरूण गझलकार आहेत तर अन्जूम मोमीन हे ही कवि लेखक आहेत. अय्युब नल्लामंदू, रफीक अहमद शेख (पंढरपुर) रईस पटेल (अक्कलकोट–स्टेशन)

महमद अल्लाबक्ष शेख (मंगलवेढा) कादंबरीकार युनूस तांबोळी (मोडलिंब) नाटककार बी एच करजगीकर नाटककार अ. गनी मुजावर, दस्तगीर राज (करमाळा) इ. र. मुल्ला गुरुजी (अक्कलकोट) नाट्य समीक्षक इसाक मणियार उर्दूचे थोर अभ्यासक व अनुवादक आसीफ फिरोजाबादी (करमाळा) हे मुस्लिम साहित्यिक मराठी भाषेची सेवा करत आहेत. तसेच फयाज इनामदार (सा. मशाल) एम. सी. शेख (सा. विश्राम श्री) एम. डी. शेख (दै. बंधु प्रेम) युसूफ शेख (सा ऐश्वर्य) रफीक अडते (शहीद टिपू सुलतान) हा. द. खलीपा (अक्कलकोट रब्बेसलाम खेख (मोहोळ) इ. पत्रकार मंडळी ही मराठी रसिकांची सेवा करत आहेत. याशिवाय अज्ञात असे अनेक साहित्यिक मराठी भाषेची सेवा करत असतील असा संभव आहे. त्यांचे संशोधन, त्यांच्या साहित्याचे प्रकाशन आणि प्रसिद्धीचे साधन म्हणून या साहित्य-संमेलनाचा उपयोग व्हावा अशी मी आशा व्यक्त करतो.

अशा मेळाव्याची ही पहिलीच वेळ, व ही सुरुवात पहाता साहित्य मंडळालाही ह्याची आवर्जून दखल घ्यावी लागणार आहे. ही सुरुवात अभूतपूर्व आहे. व ही कल्पनाही मनाला सुख देऊन जाते. या आगळ्या वेगळ्या संमेलनाचा प्रधान हेतु राष्ट्रीय एकात्मता निश्चित साध्य होईलच त्याशिवाय नाट्य, कविता साहित्याची दालने अधिकाधिक विस्तृत होतील, याची प्रेरणा पुढील साहित्याच्या प्रांगणात बहरलेल्या जाणीवा, भरभराटलेल्या दिसतील अशी आशाही याचवेळी मी धरली तर ती अनाठायी ठरणार नाही.

आपण महाराष्ट्राच्या ३० जिल्ह्यातून येथे जमलांत आमच्या नगरीची शान वाढवलीत कांही गैरसोय असल्यास आपलेपणानें सहनशीलता दाखवलीत. आमचे मित्र प्रा. अजीज नदाफ, प्रा. एफ. एच. बच्चूर, प्रा. मीर इसहाक शेख, अ. लतीफ नल्लामंदू (संपादक सा. कासिद) तसेच इतर सर्व कार्यकर्त्यांनी हे संमेलनाचे शिवधनुष्य यशस्वीरित्या उचलले आणि त्यांना प्रा. फ. म. शाहजिंदे सारखा समाजवादी विचाराचा साहित्यिक अध्यक्ष म्हणून लाभला. आणि डॉ. यु. म. पठाण सारखे संत साहित्याचे अभ्यासक उद्घाटक म्हणून लाभले त्यामुळे मुस्लिम – मराठी – साहित्य संमेलनाची दिशा स्पष्ट झाली आहे.

आपण दोन दिवस राहुन महाराष्ट्राच्या व देशाच्या साहित्याचा आणि सामाजिक बांधिलकीचा विचार कराल व हीच दिंडी ग्यानबा तुकारामच्या आखीव रेखीव मार्गावर कार्यरत राहील अशी आशा धरतो.

[धर्मण्णा मों. सादूल]

खासदार व महापौर
सोलापूर महानगरपालिका

मुस्लिम मराठी साहित्य संमेलन

मुस्लिमांच्या समस्यांचे चित्र साहित्यात आणावे

-- डॉ. यु. म. पठाण

सोलापूर-- मुस्लिमांच्या जीवनातील सुखदुःखे व समस्यांचे चित्र मुस्लिम मराठी साहित्यकांनी प्रामाणिकपणे आपल्या साहित्यात उभे केले पाहिजे असे प्रतिपादन अखिल भारती मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. यु. म. पठाण यांनी अखिल भारतीय 'मुस्लिम मराठी साहित्य' संमेलनाच्या उद्‌घाटन समारंभात व्यक्त केले.

डॉ. पठाण आपल्या भाषणात पुढे म्हणालें "दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, जैन साहित्य मुस्लिम साहित्य हे साहित्यातील विवध प्रवाह आहेत. समाज जीवनाची ती विविध अंगे आहेत, त्याचा विचार करणे ही अपरिहार्य गोष्ट आहे. मुस्लिम मराठी साहित्यिक या संमेलनानिमित्त एकत्रित आले आहेंत ही ऐतिहासिक व सांस्कृतिक घटना आहे. मराठी मातीशी, जीवनाशी व राष्ट्रीय प्रवाहाशी ते एकरूप झाले आहेत मराठी साहित्य समृद्ध करण्याच्या दृष्टीने प्रत्येक समाजातील व्यथा व जीवन वैशिष्टचे साहित्यात प्रतिबिंबीत झाली पाहिजेत." ▣▣▣

डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे भाषण-

सोलापूरचे ख्यातनाम समीक्षक डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणाले-"साहित्याचे व्यासपीठ हे संस्कृति समृद्ध करण्याचे महान व्यासपीठ होय, प्रत्येक स्तरातील सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब त्यात जेवढे उमटेल तेवढे ते साहित्याचे समृद्ध होईल या क्षेत्रात अलग "चुली कशासाठी असा प्रश्न उपस्थित केला जातो या निरनिराळया चुलीत पेटलेली आग एकच आहे आणि त्या चुलीवर तयार होणारे अन्नहि एकत्रित एकाच पंगतीसाठी वाढले जाते पंगतीत बसणारी माणसे खूप आहेत एवढे अन्न एका चुलीवर होऊ शकणार नाही. या वास्तवाचे भान ठेवले पाहिजे. मुस्लिम साहित्य, जैन साहित्य, ग्रामीण साहित्य यामुळे समृद्ध साहित्य निर्माण होणार आहे." ◎◎◎

◘ सोलापूर येथे भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्राध्यापक फ. म. शहाजिन्दे यांच्या अध्यक्षीय भाषणातील कांही मननीय भाग.

" रांगणारे मुस्लिम मराठी साहित्य नक्कीच उभे राहू शकेल. "

- प्रा. फ. म. शहाजिंदे

अमर हुतात्म्यांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या या उद्योगप्रिय महाशिवयोगी श्री सिद्धेश्वराच्या पवित्र नगरीत एक्केचाळीस साली भाऊ साहेब खांडेकरांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जसे भरले होते तसे परवा महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत प्रा. रावासाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली दलित साहित्य संमेलनही भरले होते. तिथेच आज ऐतिहासिक ठरु शकणारे हे पहिले मुस्लिम मराठी साहित्य संमेलन भरत आहे. महाराष्ट्रात सर्व दूर विखुरलेल्या मराठी भाषिक मुस्लिम समाजात घडणारी ही तशी पहिलीच सांस्कृतीक घटना आहे. याद्वारे मराठी सारस्वतात मुस्लिम मराठी वाडमय प्रवाहाची नव्यानेच ही जी पहाट होत आहे त्यामुळे अलग वादाची एक भिंत कोसळणार आहे.

हे पहिले मुस्लिम मराठी साहित्य संमेलन जरी नवोदितांना संधी उपलब्ध करुन देऊन अंधारातील मुस्लिम मराठी साहित्य प्रवाहाला प्रकाशात आणण्याच्या उद्देशाने भरवले जात असले तरी त्यांच्या पाठीमागे अनेक कारणे आहेत. १) अनेक मुस्लिम संतकवींनी, शाहीरांनी आणि आधुनिक काळातील मुस्लिम लेखकांनी मराठी साहित्याची सेवा केलेली असली तरी, ते फारसे वैशिष्टपूर्ण नाही अशीच त्याची बोळवण केली जाते.

अल्लाहाचे प्रिय प्रेषीत हजरत महंमद पैगंबर उच्च कोटीची समानता सांगितली आहे इस्लाम मध्ये माणूस कोणत्या जाती मध्ये जन्माला येतो याला महत्व नाही तर धर्मासंबंधी त्याची किती आस्था आहे हाच त्या माणसाच्या प्रतिष्ठेचा खरा निकष आहे. तसेच इस्लाम मध्ये कोणतीच वंशपरंपरा मान्य

करण्यात आलेली नाही म्हणून तर ती खलिफा पदावर आरुढ झालेल्यांच्या माता, तुर्की, ग्रिक एवढेच तव्हे तर गुलाम निग्रो मुली होत्या वाजवीपेक्षा जास्त संपत्ती असलेल्यांनी ती गरीबानां वाटली पाहिजे अशरफ ही पुरोहितांची वेगळी अशी जात किंवा विशेष धार्मिक समाज आहे. असे मानले जात नाही.

एकीकडे ही काही महान मूल्यें आहेत तर दुसरीकडे इथे सुन्नींची संख्या असली तरी सय्यद समाजालाच महत्वाचे स्थान आहे बारा बतुलेदारापैकी मुसलमान झालेल्यांना अजलाफ आणि त्याहून कनिष्ठांना अर्झल म्हणून उच्च वर्गीय मुसलमानाकडून हेटाळणी का केली जाते ? माकडवाले, टकारी, दरवेश, भंगी, जुलाह, दर्जी, कसाई, मोमीन, तांबोळी, आतार बढई, छप्परबंद, जोहरी, आणि कंजनी यांना आपण आजतरी आपल्यात सामावून घेवून समानतेच्या पातळीवर वागवणार आहोत की नांही ? समाज वास्तवातील प्रभावी जाती जातीव्यवस्था निष्प्रभ करायची की नांही? मागासलेल्या मुस्लिम जातीतील मुसलमान माणसाशी बेटी व्यवहार आपण का करीत नाही? असे आपले सामाजिक वास्तव असतानाही आपण चोख धर्माचरण न करता धर्म धर्म का करतो? अरब राष्ट्रातील मुस्लिम समाज जीवन आणि भारतीय मुस्लिम समाज जीवन यात फार मोठे अंतर आहे ते आपण समजून घेणार आहोत की नांही? विशाल मनाच्या इस्लाम धर्माने कर्मकांडातच स्वतःला कोंडून घेणे कितपत बरोबर ठरते ? या आणि या सारख्या अनेक प्रश्नाच्या मंथनातून माझ्या कवितेची मूस तयार झालेली आहे कारण मूलभूत मानवी जीवनानुभव हा सार्वत्रिक असला तरी प्रत्येक व्यक्तीचे अनुभवविश्व अनन्यसाधरण असू शकते दलित ख्रिस्ती समाजाप्रमाणे मुस्लिम समालाजाही अस्मिता आणि प्रतिमा आहे. मुस्लिम समाजाचे स्वतःचे असे काही प्रश्न आहेत काही श्रध्दा आणि वैष्टियपूर्ण मूल्यव्यवस्था आपला समाज जपतो आहे या जाणीवांनीही मुस्लिम मराठी साहित्य निर्माण झाले पाहिजे एवढेच नव्हे तर तीव्र आणि प्रामाणिक जीवनानुभव तटस्थवृतीने आणि कलात्मकरित्या मांडलेला असेल तर मग त्या अनुभवाचा विषय धार्मिक असला तरी देखील ते लिखाण वरची पातळी गाठू शकते अशा साहित्याची आजतरी सामाजीक आणि धार्मिक अभिसरणासाठी नितांत गरज आहे या माझ्या म्हणण्याचा मुस्लिम मराठी लेखक गंभीरपणे विचार करतील अशी मला नम्र आशा आहे.

मी खेडचातल्या अशा एका कुटुंबात जन्माला आलो आहे की ज्यात ''गिन्या, पडचा, उठतैय बैठतैय'' अशी दख्खनी हिंदीची भाषिक परंपरा आहे. त्यामुळे उर्दू अरबीचा गंध नाही की साहित्य कशाशी खातात हे ठाऊक नाही. धार्मिक सांस्कृतिक प्रतिष्ठा नाही की सामाजिक आर्थिक राजकीय नावाचीही एक प्रतिष्ठा असते याचे भान नाही. कुणीही याव आणि टिकली मारुन जावे असा आयुष्याचाच खेळ झालेला खेडयाचे सर्वांगिण भकासपण घराच्या कानाकोपऱ्यात भरुन माणसांच्या चेहऱ्यावर उतरलेला 'धीस इज इंडिया अॅन्ड दॅट इज भारत' अशी इथल्या सत्ताधाऱ्यांची, उच्चपदस्थांची, उद्योगपतीची असल्यामुळे हा भकास पणा जावा तरी कसा ? यासाठी आता भारतीय चिंतनाची सुरूवातच मुळी खेडचापासून केली पाहिजे. कारण मी दरिद्री आहे. म्हणून माझे कुटुंब

दरिद्री आहे. कुटुंब दरिद्री आहेत. म्हणून खेडे दारिद्रयात आहेत. खेडे दरिद्री आहे कारण खेडयातील देशाचे दारिद्रय आहे. म्हणून या खेडयांचे देश दरिद्री आहे. म्हणजे आपल्या देशाचे दारिद्रय, शेतीच्या दारिद्रयात लपलेले आहे. आपला बहुसंख्य मुस्लिम समाज शेती व मोलमजुरी करुन किंवा शेती व्यवसाय करुन जगतो आहे. भुकेला कुठली जात नसते की भाकरीला कुठला धर्म नसतो हे सर्व मी माझ्या डोळयांनी पाहिलो अनुभवलो आहे. या अनुभवातूनच माझे 'शेतकरी' हे ग्रामीण बोली भाषेतील काव्य जन्माला आलेले आहे. या माझ्या लेखनाचे भांडवलच मुळी शिक्षण वाचन समाज वास्तवातील जीवनानुभव आणि म. फुले, डॉ. आंबेडकर, हमीद भाई, नरहर कुरुंदकर यांच्या लेखनातून मिळवलेली दृष्टी असे एवढेच आहे. या एवढया भांडवलावर मी माझ्या शब्दांचा प्रपंच प्रामाणिकपणे मांडलेला आहे. माझ्या आयुष्यात प्रेमाचे एक अकरित घडून गेले आहे ज्यातून मी माझी मीतू ही पत्रात्मक कादंबरी लिहिली आहे या कादंबरीतील प्रेमाला हिंदु-मुस्लिम सांस्कृतीची एक काच आहे जी कुणीच लक्षात घेतली नाही. एवढेच कशाला माझ्या कवितासंग्रहाला राज्य पुरस्कार मिळाला कादंबरीलाही राज्यपुरस्कार मिळाला पण महाराष्ट्रातील एकाही प्रकाशकाने माझ्या कडून एखाद्या नवीन पुस्तकाची मागणी केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. आजही माझ्या ललित लेखांना प्रकाशक मिळत नाही की, माझ्या कवितांनाही प्रकाशक मिळत नाही तिथे परीक्षण लेखांना कुठून मिळणार ? माझी पुस्तके मी लिहिली. मीच ती छापली आणि मीच ती विकली. तरीसुद्धा पुस्तकांची विक्री अगदी जेमतेमच झालेली आहे. ही सुद्धा एक विदारक वस्तुस्थिती आहे. मला कुणाबद्दल तक्रार करायची नाही. तर अशा प्रतिकुल परिस्थिततून मार्ग काढण्याविषयी सूचवायचे आहे. या संमेलनातून एखादी प्रकाशनसंस्था आणि त्याची एक वितरण व्यवस्था निर्माण झाली तर त्याला तुम्ही सर्वांचे सहकार्य लाभले तर आपले रांगणारे मुस्लिम मराठी साहित्य नक्कीच उभे राहू शकेल असे मला मनापासून वाटते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेनुसार सर्वांना समान संधी मिळून कुणीच उपाशी मरणार नाही असे समाजवादी राज्य येईल, धर्म ही एक खाजगी बाब राहुन त्याबाबत पक्षपात होणार नाही, गरीबी नाहीशी होईल, अशी सर्वसाधारण भारतीय जनतेची अपेक्षा होती. पण या अपेक्षा अपेक्षाच राहिल्या आणि उलट गरीबी वाढत राहिली. गरीबाला हलकी वागणूक तर श्रीमंताना, अधिकाऱ्यांना खास वागणूक मिळू लागली लाचलुचपत आणि भ्रष्टाचार्यांने परिसामा गाठली असल्याचे दिसून येते. आज सर्वांना समान न्याय मिळत नाही हिंदु-मुस्लिमवाद, दलित – दलितेतरवाद कमी होण्याऐवजी दिवसेदिवस भडकत आहे. जातीवादाच्या भस्मासुराने थयथयाट सुरु केला आहे. त्यामुळे मूळ मानवतावादी विचार बाजूला पडत आहेत. पैसा, सत्ता, जातीधर्माचा अभिमान आणि आपापल्या उद्योग व्यवसायाचा विचार करुन वेगवेगळया संघटना, गट आणि चळवळी सुरु आहेत. पण सर्व भारतीय समाजाच्या हिताचा एकत्र विचार करताना मात्र कुणी आढळत नाही, म्हणून तर सर्वसामान्य माणूस हवालदिल झालेला आहे. आपला आता कुणीच वाली नाही अशी सर्वसामान्य गरीब माणसाची भावना झालेली आहे. उदात्त आणि महान अशा

धार्मिक मूल्यांचा तर आपणाला विसर पडलेला आहेत शिवाय, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज आणि म, गांधी यांच्या विचारांचा वारसाही आपण विसरत चाललो आहोत. निवडणुका लढविणे आणी काहीही करुन त्या जिंकणे हा सर्व पक्षांचा एक कलमी कार्यक्रम झालेला असल्यामुळे लोकांच्या गरीबींचा गैरफायदा घेऊन जातीधर्माच्या तर कधी प्रांत भाषेच्या नावावर अराजक माजवले जात आहे.

यातून गुन्हेगारी, दडपशाही, बेपर्वाई, वाढत आहे. याचाच परिणाम म्हणून आज अनेक प्रांत धगधगू लागलेले दिसतात. म्हणून सामान्य जनतेचे हाल होत आहेत. सर्वांनी एकत्र येवून विचारपूर्वक आणि कायदेशीर मार्गांचा अवलंब करून हे सर्व बदलेले पाहिजे. अशा वेळी साहित्यिकांची समाजिक जबाबदारी प्रभावीपणे वाङमयरुपात प्रकट झाली तर समाज स्वास्थय टिकु शकते शब्दांचा फूलासारखे आणि शस्त्रासारखा वापर कोणताही खरा कलावंत करु शकतो यावर साऱ्या जगाचा विश्वास आहे कविता शब्दोंकी अदालतमें मूजरिमके कटघरमे खडे, बेकुसुर आदमीका इलफनामा हैं असे इलफनामे तुम्ही आम्ही आता लिहिले पाहिजेत कविता, कथा, कादंबरी इत्यादी सारखे सर्व वाङमयाकडे पाहण्याची निकोप दृष्टी आहे, ही दृष्टी आत्मसात करुन आपण लिहिले पाहिजे खरोखरच भाषा ही संस्कृतिकडे उघडणारी खिडकी असते भाषा शूद्ध-अशूद्ध असत नाही तुम्ही जी दख्खनी हिन्दी मिश्रित मराठी बोलता तीही वाङमय निर्मितीसाठी तुम्ही बिनदिक्कत पणे वापरु शकता तुमच्या जवळ आजच्या जीवनाचे जिवंत अनुभव आहेत हे जिवंत अनुभव तुम्ही तुम्हाला येत असलेल्या मराठी भाषेतुन केवळ इमानदारीने व्यक्त केलें तरी त्यात वाङमयीन गुणवत्ता येऊ शकेल प्रामाणिकतेचा सुगंध तुमच्या लेखनात दाखवू लागला तर ते लेखन वाडमयीन दृष्टया महत्वाचे ठरु शकते

आज अपण अनेक प्रश्नांच्या, समस्यांच्या गर्दींत जगत आहोत. अपण सर्व विशेषतः मराठी भाषिक मुसलमान होत आपल्या मनात उच्चनीचतेच्या शृखंला खोलवर रूजलेल्या आहेत जाती पोटजातीची उतरंडीही आपल्या मनात दबा धरुन बसलेली आहे तरीही का कुणास ठाऊक या समस्ये कडे आपण समस्या म्हणुन कधी पहात नाही तसेच आपण आधुनिक शिक्षणाच्या बाबतीत खुपच मागासलेले आहोत म्हणुन आपल्या समाजाची आर्थिक स्थिती भयानक आहे तरीसुद्धा आपण या प्रश्नांकडेही कधी प्रश्न म्हणुन गंभीरपणे लक्ष देत नाही. म्हणन आता काळाची पाऊले ओळखून इतिहासात रमलेले आपले मन खेचून आधुनिक काळात आणले पाहिजे. इतिहासानुरुप वागण्याचे सोडुन देऊन आपण इतिहासा पासुन शहाणपण घेतले पाहिजे, असे मला मनापासुन वाटते.

□□□

प्रा. फ. म. शहाजिंदे
"अशरफ," अंतर भारतीय
वसाहत, औराद शहाजानी,
जि. लातूर. पिन. ४१३५२२

मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाची आवश्यकता.

– मुबारक शेख.

सोलापूर

साहित्य माणसाला जीवनविषयक एक व्यापक व शास्वत दृष्टिकोन देते, साहित्यातील नानाविध प्रकार खऱ्या अर्थाने जीवन जगण्याचा मार्ग दाखवितात. म्हणूनच साहित्य हे मानवी मनाला अनादी काळापासून मोहविणारे एक प्रभावी साधन ठरले आहे. दया, करुणा, सहानुभूती, प्रेम, वात्सल्य, हुरहुर अशा अनेकविध मानवी भाव – भावनांचा, सुख–दुःखाचा आविष्कार साहित्यातून घडत असतो. तसे साहित्य हे विश्वात्मकच आहे. म्हणूनच संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले आहे. मराठी साहित्यात अनेक मुस्लिम साहित्यिकांनी प्राचीन काळा पासून ते वर्तमान काळापर्यंत अखंडपणे मोलाची भर घातली आहे. मराठी साहित्याला आपल्या परीने फुलविण्याचे व समृद्ध बनविण्याचे कार्य मुस्लिम साहित्यिकांनी तळमळीने व प्रामाणिकपणे पार पाडले आहे. हे ऐतिहासिक सत्य आहे, मराठी साहित्याला मुस्लिम साहित्यिकांनी दिलेली बहुमोल देणगी साहित्याच्या विविध प्रकारांतून व रचनातून ठळकपणे व्यक्त झाली आहे.

– साहित्याचे सामर्थ्य –

भारतासारख्या खंडप्राय देशात आज हिन्दु – मुस्लिम बांधव शेकडो वर्षे गुण्यागोविंदाने राहत आले आहेत. आपल्या संस्कृती–प्रमाणे आचरण करीत मानवी प्रेमाच्या धाग्यांनी त्यांचे हुदय एकत्रित ठेवण्याचे ठोस कार्य साहित्याने व साहित्यिकांनी मोठ्या निष्ठेने पार पाडले आहे. मानवी जीवनात उच्च उदात्त मूल्यांची उज्जवल परंपरा जोपासण्यासाठी मुस्लिम साहित्यिकांनी आपली लेखणी वेळावेळी जाणीवपूर्वक झिजवली. राजकीय

स्वार्थापायी लोकांना अज्ञानात ठेऊन त्यांच्यात फुटिरतेचे विष पेरण्याचे कृष्णाकृत्य सत्तांध राजकीय पक्षांनी व कार्यकर्त्यांनी जरी केले असले तरी हृदय जोडणारे साहित्यिक या जातीयवादाच्या फोफावणाऱ्या संहारक अग्निपासून समाजाचे संरक्षण करण्यास आजही समर्थ आहेत. आपल्या प्रभावी लेखणीने मानवतेचे धडे समाजाला निर्भयपणे शिकवण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य मुस्लिम साहित्यिकांनी आपल्या जीवनांत गरीबी व प्रचंड हालअपेष्टा निमूटपण सहन करुनही कर्तव्यभावनेने केले आहे. केवळ साहित्याच्या माध्यमातूनच आजचा दिशाहीन भरकटत व विस्कटत चाललेल्या समाजमनाला प्रगतीच्या खऱ्या मार्गाला लावता येणे शक्य आहे.

द्वेषापायी वाया जाणारी शक्ती व बुद्धी रचनात्मक कार्यासाठी वापरता आली तर येणाऱ्या उद्याच्या पिढीचे किती तरी यक्षप्रश्न हे सुलभ व सुकर होणार आहेत. आर्थिक व सामाजिक क्षेत्रात काळाने फार मोठी आव्हाने आपल्या समोर उभी करुन ठेवली आहेत की ज्यांचा आपणा सर्वांना एक दिलाने सामना करावा लागणार आहे. अशा वाटचालीतून उद्याच्या नव्या युगाची पहाट उगवणार आहे. अंतराळात झपाट्याने प्रवेश करणाऱ्या मानवी प्रज्ञेला महानतेचा साक्षात्कार केवळ साहित्यिकच घडवू शकतात म्हणून आजच्या काळात मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाची नितांत आवश्यकता आहे.

– समान हक्क –

या साहित्य संमेलनाने मुस्लिम बांधवांनी केलेली मराठी साहित्याची सेवा उजेडात येणार आहेच पण त्याचबरोबर साहित्य हे कसे सर्व स्पर्शी त्रिकालाबाधित सत्य आहे, याची जाणीवही संकुचितपणाला स्वाभिमान समजणाऱ्या 'कूपमंडक' प्रवृत्तीच्या लोकांना होणार आहे. बदलत्या काळात क्षुद्र मनोवृत्तीतून समाजाची दिशाभूल करणाऱ्यांना खडसावून जाब विचारण्याचे व समाजाला मानवतेच्या मार्गावर अग्रेसर करण्याचे कार्य या मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाने पार पडणार आहे. मराठी साहित्याची सरिता अखंडपने खळाळत वहात आहे. कोणीही तिला अडवू शकणार नाही, तिच्यावर सर्वांनाच समान हक्क आहे, याची जाणीव या मुस्लिम मराठी साहित्य संमेलनातून निश्चितपणे प्रकट होणार आहे, मराठी साहित्याची वेगवेगळया प्रवाहाची होणारी दमदार वाटचाल किती रम्य आहे. याची प्रचीती मुस्लिम मराठी साहित्यिकांच्या संमेलनातील साहित्याच्या नानाविध प्रकारातून येणार आहेत व ही जाणीव सामान्यापासून साहित्यिकांपर्यंत सर्वांना सुखद आश्चर्याचा धक्का देणार आहे.

मराठी साहित्याला एका नव्या उंबरठ्यावर आणून सोडण्याचे कार्य या मुस्लिम मराठी साहित्य संमेलनद्वारे काही प्रमाणात कां होईना पण यशस्वीपणे पार पाडणारे आहे. हीच या संमेलनाची फलश्रुती आहे. या संमेलनाने आपणास काय दिले असा सवाल अनेकांच्या मनात उभा राहाण्याची शक्यता असली तरी असे संमेलन सोलापूरात हुतात्म्यांच्या पावन नगरीत उत्साहाने, स्नेहाने भरले हीच एक मोठी जमेची बाजू राहील.

साहित्याला प्रेमाप्रमाणे भावनेची भाषा समजते हे ऐतिहासिक सत्यही या प्रसंगाने पुन्हा एकदा सिद्ध होणार आहे. तसेच वैफल्याच्या व

नैराश्याच्या खोलदरीत कोसळणाऱ्या समाज–मनास उभारी आणण्याची व उद्याच्या युगाची सुख – स्वप्ने त्यांच्या मनात निधारेंरपूर्वक फुलविण्याची बहुमोल कामगिरी मुस्लिम साहित्यिकांनी वेळोवेळी चोख बजावली आहे. व यापुढेही ते हे कार्य कसे पार पाडीत राहाणार आहेत याचे दिग्दर्शनही या संमेलनाद्वारे घडणार आहे. या संमेलनाद्वारे अनेक दुभंगलेली मने एकत्रपणे सांधण्याचे कार्यही सहजपणे पार पडणार आहे. म्हणून आजच्या या समेलनातून एक चिरतन स्वरूपाची स्फूर्ती केवळ इथे येणाऱ्यांनाच नव्हे तर बाहेरील साहित्यप्रेमीच्या मनात निर्माण होऊन त्या प्रेरणेचा नवसाहित्य निर्मितीत ठसा उमटून पुढील पिढीलाही एक निकोप, निरोगी दृष्टिकोनाचा आदर्श लाभणार आहे. या संमेलनाद्वारे परस्पर सामजंस्य व बंधुभावाचे वातावरण निर्माण होऊन उच्च मानवी मूल्यांची जोपासना होणार आहे.

साहित्याला व्रत मानून मानवी जीवन व्यतीत केलेले अनेक निष्ठावंत साहित्यिक या व्यासपीठावरून आपल्या ओजस्वी व यशस्वी वाणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणार आहेत व हेच श्रोते ठायी – ठायी जाऊन या विचारांचा प्रचार व प्रसार प्रेममय व शांततामय जीवन–सरणी निर्माण करण्यासाठी करणार आहेत. त्यामुळे आजच्या गोंधळलेल्या, भांबावलेल्या समाजात स्थिर व स्वच्छ दृष्टि देण्याची अजोड कामगिरी या संमेलनाने पार पडणार आहे म्हणूनज आज मुस्लिम मराठी साहित्य संमेल–नाची आवश्यकता आहे.

– नवे कार्य –

सोलापुर सारख्या गिरणींकामगारांच्या शहरात अशा प्रकारचे साहित्य संमेलन घडावे हा एक अपूर्व योगयोग आहे. आजच्या तणाव–पूर्ण वातावरणात या साहित्य संमेलनांचे प्रयोजन फार मोठे आहे. यातुनच्च वैचारिक प्रबो–धनाचे नवनवीन तडफदार तरुण साहित्यिक निर्माण होऊन मराठी साहित्याबरोबरच मराठी मनाची जडणघडण करण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात होणार आहे. विद्वेषाची आग पेटवून तिच्यावर आपल्या सत्तेची पोळी भाजणारे ढोंगी राज्यकर्यांचे पितळ उघडे करुन समाजात खरी माणूसकीची ज्योत प्रज्वलित ठेवण्याचे महान कार्य या संमेलनातून पार पडणार आहे.

नव्या युगाचा उष:काल होता होतात्र जातीयवादाची काळरात्र झाली आहे म्हणूनच साहित्याच्या या मशाली पेटविणे आवश्यक व अपरिहार्य झाले आहेत. मुस्लिम साहित्यातून मराठी मनाचे पोषण करणारी नवी शक्ती प्रकट होऊन उद्याच्या युगाला तारक ठरणार आहे यात तीळमात्र शंका नाही.

"मुस्लिम मराठी साहित्य संमेलन" ही कल्पनाच मुळात आगळी – वेगळीं आणि भव्य – दिव्य आहे. साहित्यिक मनाला भाव–णारी, वेडावणारी आहे. व त्यातूनही सोलापूर सारख्या साहित्य क्षेत्रातील उदयोन्मुख शहरात असे साहित्य संमेलन व्हावे यामागेही विधा–त्याचे काही कल्याणकारी संकेत खचितच दडलेले आहेत.

स्नेहाचे अंकुर मराठी मनांत रुजविण्याचे कार्य या संमेलनाने पार पडले तर पूढील काळात योग्य वातावरण लाभताच या अंकु–राचे महावृक्ष होऊन येणाऱ्या पिढयांना शीतल छाया व माया देण्याचे विधायक कार्य या संमेलनातून पार पडणार आहे. म्हणून हेच

संमेलन वरदान ठरणार आहे व मराठी साहित्याच्या इतिहासात एक सोनेरी पान या मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाने उघडले जाणार आहे. मराठी साहित्याची मुस्लिम साहित्यिकांनी इमाने – इतबारे केलेली सेवा या देशाच्या उभारणीसाठी किती मोलाची आहे. याचा या निमित्ताने आढावा घेतला जाईल व साहित्याच्या पुढील विकासाचा आ–राखडाही तयार केला जाईल. एकंदर हे मुस्लिम मराठी साहित्य संमेंलन सोलापुर वासीयांना लाभलेली एक महान पर्वणी आहे.

प्रेमाची व बंधुभावाची ज्योत जागवीत व "प्रेमकी गंगा बहाते चलो" हा मानवतेचा संदेश देत प्रत्येकाच्या जीवनात प्रेम, प्रकाश प्रकट करण्याची ऐतिहासिक कामगिरी मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या अनुषंगाने करायची आहे. नव्या युगाचा दिव्यध्वनी का–नावर पडत असताना थोडेदेखील गाफील न राहता नवीनतेच्या स्वागतासाठी एकात्मतेची आरती घेऊन अपेक्षापूर्तींचा मार्ग लक्ष – लक्ष, दीपज्योतीने उजळण्याचे भाग्य या संमेलनाला लाभले आहे. हे एक अभिमानाचे लेणे आहे. या चैतन्यशाली व तेजोमय कार्यात समस्त साहित्यिक सुफळ संपूर्ण होवो हीच एक मनस्वी अभिलाषा ठेवून मुस्लिम मराठी साहित्य संमे–लनाची गौरवशाली वाटचाल आनंद व अभि–मानाने ओसंडलेल्या नेत्रांनी पाहात राहु या.



मुस्लिम मराठी साहित्य संमेलन 'प्रवाह की नवी दिशा ?

सय्यद अलाउद्दीन
मु. पो. आष्टी (जि. बीड)

आज पर्यंत मराठी साहित्य विश्वात तरी दलित साहित्य संमेलन, ग्रामीण साहित्य संमेलन, दलित – आदिवासी साहित्य संमेलन विदर्भ साहित्य समेलन, मराठवाडा साहित्य संमेलन, श्रमिक साहित्य संमेलन, जनवाद साहित्य संमेलन, ख्रिस्ती साहित्य संमेलन, जैन साहित्य संमेलने तालुका, जिल्हा पातळीवर भरवली गेली आहेत. त्यात या वर्षी नव्यानेच आणखी एक भर पडते आहे ती म्हणजे "मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाची.

आजवर अ. भा. मराठी साहित्य संमेलनास जे जत्रेचे स्वरुप येते आणि रात्र थोडी सोंग जास्त असल्याने विचारांची आणि संधीच्या व्यासपीठाची बैठक विस्कळीत ठरते त्याच्या विरुद्ध अशा लहान लहान आणि विशिष्ट विचारांना वाहिलेली संमेलने विचार आणि भावनांच्या देवाण घेवाणीच्या बाबतीत विलक्षण बोलकी आणि जवळची वाटतात. कारण यात नवोदितांना व्यासपीठ आणि विशिष्ठ विचारांची कदर केली जाते.

अशी वेगवेगळी संमेलने असावीत की नसावीत हा जरी वादाचा मुद्दा ठरत असला तरी त्या पाठी मागील भूमिका समजावून घेण्याची खरी गरज आहे. उदाहरणा दाखल पहावयाचे झाल्यास प्रा. डॉ. गंगाधर पाणतावणेच्या प्रेरणेने 'अस्मितादर्श' मेळावा. दलित साहित्य, दलित नाटच संमेलने घेतली गेली नसती तर दलिता मधून येणारी जी नवी पिढी आहे तिला आपले दुःख, विचार मांडण्याची संधी कदापी मिळाली नसती तितक्याच टोकाने पहावयाचे झाल्यास पुण्याच्या जीवन किर्लोस्कराने घेतलेले "सावरकर विचार साहित्य संमेलन" त्या त्या विचार प्रवाहास नव्या

पिढीतील साहित्यिकांना प्रेरणादायी ठरत असते. हाच उद्देश ग्रामीण, आदिवासी, श्रमिक, जनवादी. दलित, ख्रिस्ती, जैन, साहित्य संमेलनाच्या बाबती घडतो.

अशाच कांही चिकित्सक दृष्टीनें सोलापूर येथे होत असलेल्या मुस्लिम – मराठी साहित्य संमेलनाकडे पहाण्याची गरज आहे, वर वर पहाता हा जरी इतर संमेंलना प्रमाणे एक प्रवाह वाटत असला तरी मुस्लिम समाज आणि मुस्लिम साहित्यिकांपुढे छळणाऱ्या समस्या बिकट आहेत. कांहीशा वेगळया आहेत. ग्रामीण साहित्यातून शेतीवाडी, मजूरी, सावकारशाही, दुष्काळ खेडे – शहर द्वन्द, परंपरा अशा संघर्षाची ग्रामीण भाषेतून साहित्यिक व्यथा मांडतात. दलित साहित्यातून अस्पृश्यता ही महत्वाची समस्या आहेच. तरीं ही बेकारीं, अज्ञान अंधश्रद्धा हे प्रश्न हताळलेले दिसतात याच प्रवाहाला अनुमधून मुस्लिम साहित्याकडे पहात असताना जातीय तणावातून निर्माण होणाऱ्या दंगली, मुस्लिम समाजातील अज्ञान, कमालीचा अशिक्षितपणा, काळाच्या प्रवाहा बरोबर किंचित ही न बदलण्याची प्रवृती, तलाक मुळे निर्माण होणांऱ्या स्त्री समस्या, इतर राष्ट्रांच्या राजकीय हालचाली वरून उद्‌भवणारा छळवाद, इतिहास काराने मांडलेल्या विकृत इतिहासाच्या चौकटीतुन समाजाचा मुस्लिमांकडे पहाण्याचा दृष्टिकोन. परंपरेतील असाम्यता, जयंत्या, उत्सवांच्या मधून उद्‌भवणाऱ्या दंगली, सर्वं सामान्य माणसांच्या कत्तलींची शोकांतिका, भाषा – लिपीवाद, आपल्यांतील वरिष्ठांचे वर्चस्व असे असंख्य प्रश्न कथा नाटक, कविता या मधून छेडले जात आहेत. मांडलेही जातील त्या साठी संमेलनाच्या माध्यमातून नवी दिशा मिळण्याची गरज आहे. म्हणूनच मुस्लिम मराठी साहित्य संमेलनास विशिष्ट समाजाचे म्हणण्या ऐवजी विशिष्ट समस्यांचे संमेलन म्हणावे लागेल.

महाराष्ट्रातील बहुसंख्य मुस्लिम समाज हा खेडयात आहे. खेडयातील हिन्दु समाजा प्रमाणेच त्यांचा व्यवसाय शेती, मजूरी शेती लगत जोड धंदे, व्यापार, मुलाणकी हा आहे. परंपरा वेगळी असली तरी नात्या प्रमाणे स्नेहसंबंध जपले जातात. सण, उत्सवात लग्न समारंभात आपसात सक्रिय सहभाग असतो. मातृभाषेइतकीच मराठी भाषा प्रिय असते. मात्र खेडी अनुकरणाच्या दृष्टिनें, राजकारणाच्या दृष्टिने जसजशी शहरी बनु लागली आहेत तसे तसे शहरां प्रमाणे हिन्दु – मुस्लिम दंगे, हाडवैरपणा गटतट यांचे भक्ष होण्याची भिती निर्माण होऊ पहात आहे. आणि हाच साहित्याचा विषय बनतों आहे. सर्व समाजात राजकीय दृष्टिकोणातून जातीय बांधणी, करुन मानवी मनाला जातीय समस्यांचीं दाहक अग्नीकुंड निर्माण करुन माणुसकींचे वरदहस्त कापले जावेत हाच मुस्लिम साहित्याचा विषय आहे.

गेल्या ६०० शें वर्षां पासून मुस्लिम साहित्यिकाँनी मराठीची सेवा सातत्याने चालू ठेवली आहे. अरब राष्ट्रातील बादशहांची भारतात राज्य स्थापना त्यांच्या पदरी मराठी सरदारांच्या नोकऱ्या या मुळे मराठी भाषेची देवाण – घेवाण राजदरबारी घडू लागली मुस्लिम असलेले मराठी कवि राजकवि म्हणून राजाच्या पदरी राहिले आणि त्यांनी हिंदूसंस्कृतिच्या ग्रंथ, पुराणावर भाष्य केले काव्य केले. अंबर हुसेन याकुब आणि हुसेनी पिता–

पूत्रांनी मराठीत अनुक्रमे शंकर भाष्य व गीतेवर टीका लिहीली. अब्दुल आबालाल, करीम कासम, गरीब अब्दुल, फत्तेशा, बाबासाहेब, बबन राजे बापू, शेख मिराजी, इत्यादी कविंनी मोहरमच्या दुःखद प्रसंगावर "रिवायती" लिहिल्या. संत परंपरेच्या काळात आलमखान, आजम, बाशीत, पठाण बऱ्हाणशा. शहाफकिर शेख महंमद, शेख सलीम महंमद, शेख सुलतान शेरदाजी, सय्यद अहमद, जंगला फकीर, हकीम यांनी अभंग, पदे मराठीत रचली.

राजेशाहीच्या काळात शृंगार आणि वीर रसांचा खऱ्या अर्थाने गौरव होत होता त्याचा साहित्य प्रकार म्हणजे पोवाडा व लावणी होय यात ही अमृत फाजलखां, अली फकीर, जाफर नरसू, दादु पिंजारी, शा अली, शहा नवरंग शेख भाई, शेख वली वस्ताद, हुसेन खान, बरोबरच सगन भाऊ शिकलगार व शाहीर अमर शेख यांच्या सारख्या मुस्लिम शाहीरांनी लावण्या व पोवाडे रचुन तत्कालीन मराठी मनाला नवचैतन्य दिले. स्फूर्ति दिली. आधूनिक काळातील लोकसंगीताच्या क्षेत्रात ही शेख जैनू चांद, पठाण आणि पार्टी यासीन महाब्री यांनी वारसा चालवलेला आहे.

मराठी वाङ्मय क्षेत्रात अभ्यासक, विचारवत म्हणून असगर अली इंजिनिअर, डॉ. यु. म. पठाण, अलीम वकील, हमीद दलवाई तर इतिहास संशोधक डॉ. शेख रमजान, संस्कृतपंडित म्हणून दस्तगीर जली बिराजदार यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कादंबऱ्यांच्या बाबतीत संख्या आणि प्रगलभता तोकडी असली तरी प्रा. फ. म. शहाजिंदे यांच्या मीतु चा उल्लेख आवश्यक आहे. नाटकात स. मो. इनामदार, मुबारक तांबोळी यांच्या सारखे नवोदित नाटककार पूढे येत आहेत परंतु त्यांची दिशा समाज समस्यांच्या वेगळया बाजूस झूकते आहे.

कथाकारांमध्ये प्रा. सौ. तसमीन पटेल सारख्या स्त्री कथाकार मुस्लिम स्त्रियांच्या वेदनांचा अभ्यास करीत परदेशातील अरबांच्या भारतातील स्त्रीयांशी, नवविवाहितांशी, त्यांच्या जीवनाशी क्रूर खेळ आणि त्यातून उद्भवणारी वेश्या प्रवृती कथेमधून मांडीत आहेत तर खलील खान सारखा व्यंग कुंचलावीर समाज चित्रण कथेतून व्यक्त करतो आहे ज्या प्रमाणें जातीने दलित नसून ही उपेक्षितांचे अंतरंग मांडण्याचे (साहित्यातून) मोलाचे कार्य श्री. म. माटे यांनी केले त्याच प्रमाणें मुस्लिम साहित्याच्या बाबतीत व्यंकटेश मांडगूळकरांच्या 'मानदेशी माणस' तील 'मुलाण्याचा कळस' 'तांबोळयाची आजी' या बरोबरच नारायण सुर्वे, वसंत फेणे, साहेब खंदारे यांच्या कथा, काव्य, ललिता मधून मुस्लिम जीवन व्यथेचे चित्रण झाले आहे. आत्मकथानात मलिका अमर शेख चे 'मला उधवस्त व्हायचय' 'मैलाचा दगड ठरते.

कथा, काव्य, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखनात मुमताज रहिमतपूरे, नसीमा पठाण, प्रा. अजीज मुकरी, शाहनाज तांबोळी, प्रा. मीर इस्हाक शेख, यांच्या बरोबरच मुल्लांअली अब्बास, इलाही जमादार, अंजुम मोमीन, रजिया पटेल, फ. म. शहाजिंदे, मुबारक शेख खलील मोमीन, सय्यद अलाऊद्दीन, शेख जे.सी सय्यद वशी परवाना, कु. सय्यदा बेगम, शेख युनूस, सय्यद एम. एच. (मोहा) युसूफ पठाण (हवा) मोईनुद्दीन चिश्ती, मुसा हवालदार, कु. इ. नदाफ, कॉम्रेड गुलाब नदाफ, हे कवी नव्या जाणीवा नवी प्रेरणा घेवून वाचकापुढे येत आहेत तर चित्रपट गीत लेखन, दिग्दर्शनात

डॉ. जब्बार पटेल, शाकीर शेख, इलाही जमादार, लियाकत खान, सय्यद अल्लाउद्दीन पुढे पाऊल उचलून आहेत.

मुस्लिम मराठी साहित्य परिषदेच्या प्रेरणेने सोलापुर येथे होत असलेल्या पहिल्याच मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्तानें मराठी भाषेची सेवा आणि समाजातील भेड- सवणाऱ्या समस्या या वर विचार होईल आणि कोणत्या बाबींना साहित्यात अजूनही स्थान मिळाले नाही ? कोणता विषय मुस्लिम साहित्यात येण्याची काळाची गरज आहे ? याची चर्चा, परीसंवाद, व्याख्याना द्वारे परामर्श घेतला जाईल हेच महत्वाचे समाज प्रबोधन ठरेल कारण लेखन आणि विचारानेच समाज बदलता येतो. घडवता येतो.

–०–०–०

मुस्लीम मराठी कोरीव लेख

आनंद कुंभार, सोलापूर.

प्रास्ताविक

इस्लामच्या स्थापने नंतर इ. म. ७१२ पासून म्हणजे मुहंम्मद बिन कासिमच्या स्वाऱ्या पासून उत्तर भारताचा व मुस्लिम राजकर्त्यांचा संबंध सुरु झाला त्या राज्यापासून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर अरबी व्यापाऱ्यांचे संबंध दक्षिणेंत प्रस्थापित झालेले होते.

राजभाषा फारसी – इतर प्रादेशिक भाषा

प्रारंभी मुसलमान सत्ताधिशांची राज-भाषा ही फारसी होती. कालपरत्वे आणि प्रांतपरत्वे गरज म्हणून त्यांना प्रादेशिक भाषांना सुद्धा आश्रय द्यावा लागला. भारतामध्ये अनेक भाषा व लिपी प्रचारात होते व आजही आहे. ज्या प्रदेशांतील प्रजेवर आपण राज्य करतो, त्या प्रदेशातील प्रेजच्या मातृभाषांतूनच व्यवहार करणे उचीत ठरते, म्हणून राजभाषा जरी सामान्य प्रजेसाठी जे जाहिरनामे व कायदे असत त्याच्या अमल प्रादेशिक भाषांतूनच होत असत. हा संकेत बिटीशांनी सूद्धा पाळलेले दिसून येते. केवळ मराठी भाषेच्या संदर्भातच आपणास विचार करावयाचा असल्याकारणाने त्या बाबतीत मुसलमान शासकांनी काय धोरण ठेवले होते ते पाहु.

पहिला मुस्लीम मराठी शिलालेख.

कागद सुलभतेनें उपलब्ध होण्यापूर्वी किंबहुना त्याच्या सुकाळ होण्यापूर्वी शासकीय आदेश, दान धर्माच्या नोंदी किंवा अश्याच प्रकारच्या इतर नोंदी धातुंच्या पत्र्यावर अथवा दगडावर कोरुन ठेवले जात असत. ह्या कोरीव लेखांची सृष्टी, त्याचा इतिहास आणि विस्तार हा फार विस्तारीत विषय आहे. मुसलमान शासकांना दगडांचा व धातूंच्या पत्र्याचा फारसा उपयोग करावा लागला नाही. कारण कागद सुलभतेने उपलब्ध होत होता. म्हणून इतर प्राचीन आणि मध्ययुगीन शास-कांपेक्षा मुसलमान शासकांचे कोरीव लेखांचे प्रमाण कमी आहे. शिवाय ह्या कोरीव लेखांचे अंतरंगही थोडीशी भिन्न आहे, मशीद निर्मिती, किलल्यांची व त्याच्या तटा – बुरुजांची दुरुस्ती विहिरी, हौद अथवा कारंजी व पाट बाँधल्याचे उल्लेख करणे एवढाच मर्यादित व स्थूल उद्देश मुस्लिम कोरीव लेखांचा दिसतो. काही अप-वादात्मक लेख आहेत. परंतू प्रमाण कमी. दगडावरचे लेख हे चिरंजीव लेख म्हणून गणले जातात म्हणून क्वचित प्रसंगी थडग्यावर सुद्धा लेख कोरून ठेवलेले अढळतात.

इतर भारतीय भाषा पेक्षा किंबहूना दक्षिण भारतीय भाषांपेक्षा मराठी भाषेमध्ये कोरीव लेखांचे प्रमाण आत्यल्प आहे. त्यातून मुसलमान शासकांचे म्हणनेच मुस्लीम मराठी कोरीव लेख नगण्य आहेत. हे लेख त्या काळाची

म्हणून कोरले गेले पुढे अभ्यासकांत त्यचा उपयोग होईल किंवा व्हावा हया दृष्टीने त्यांची निर्मिती झालेली नांही कोरींव लेखांचा अनेक दृष्टीनी अभ्यास करता येतो त्यांची अभ्यासा-च्या दृष्टीने अनेक वैशिष्ठये आहेत त्यापैकी भाषेच्या दृष्टीने महत्व म्हणजे त्यांच्या उपल-ब्धीने आणि वाचनाने आपणास समकालीन भाषेचे मूळ स्वरुप जसेच्या तसे उपलब्ध होतो म्हणजे असे की, कोरीव लेख नष्ट वा खंडीत होतील परंतू भ्रष्ट कदापी होणार नाहीत एकदा जे कोरले ते एकदम पक्के त्यात भेसळ होण्याची शक्यता नाहीच.

आपणास पहिला मुस्लिम मराठी लेख सापडतो तो आदिलशाहच्या राजधानीत. म्हणजे कर्नाटकातील विजापूरात. विजापूरातील अर-किल्लेमधील मंदीर-मशीद इमारतीच्या एका खांबावर ७ ओळीचा मराठी शिलालेख आहे. त्याचा काळ आहे. शके १२४२ (इ.स.१३२०) खिलजी कुतूबुद्दीन याचा एक अधिकारी करिमुद्दीन यांने सदरील मशीद बनविल्याची नोंद त्यात आहे हचा तथाकथीत मंदीर-मशी-दीचा इतिहास फार रोचक आहे तो जिज्ञासूनी मूळातूनच वाचावा १ दक्षिणभारतातील ही एक सर्वांत जुनी मशीद म्हणून ओळखली जाते हचा शिलालेखाचे वाचन खाली देत आहे.

खिलजी कुतूबुद्दीन याच्या वेळचा विजापूर शिलालेख

१) स्वास्ति श्री. सकु १२४२ शैद्रि सवधरे श्री षुदुबुद्दीन राय वि-

२) जेयराज्योदईत तंनीरोपीत मलिक क्रिमीदिन दक्षीण

३) वरणाक्षि वीजेयापूरी वडिल मषिती करविली

४) सालहौटगेचा सुतारु रेवैऐ मक्षिति केले। मली

५) के मान्य करुन वेवितूरि सेत नीतने चौवीस घ-

६) र चौवीस हाथ / निस्त्रोत्र करुनु दिधले मंग-

७) ल माहाश्री ॥

संपूर्ण महाराष्ट्रात भिन्न भिन्न मुसल-मानी राज घराण्याचे भिन्न भिन्न काळात राज्य होते. त्या त्या विभागात त्या त्या शासकांचे कोरीव लेख सापडले आहेत. अद्यापी काही उजेडात येत आहेत. सातारा, सांगली, कोल्हापुर सोलापूर तथा गोवे मध्ये आदिलशाही राज घराण्याचे कोरीव लेख सापडतात नगर व मराठवाडयात आणि काही प्रमाणात विदर्भांत ही मुस्लीम मराठी कोरीव लेख सापडतात त्या सर्वांचा येथे समावेश करता येणे शक्य नाही. म्हणून येथे हया पुढे फक्त सोलापूरात उपलब्ध झालेले मुस्लीम मराठी शिलालेखांचा समावेश केलेला आहे.

पोवाडा छंदातील शिलालेख

सोलापूर विभागावर आलटून पालटून विजापूरचे आदिलशाह तथा अहमदनगरच्या निजामशाहीचे राज्य होते, हे इतिहासाच्या अभ्यासकांना माहित आहे. हया दोन शाहयां-पैकी आदिलशाहांचे काही कोरीव लेख सोला-पूरच्या किल्ल्यात आढळतात. किल्ल्यातील एका विहीरीवर एक लेख सापडला आहे. तो सुलतान महंमद आदिलशाह (१६२६-५६ इ. स.) च्या कारकिर्दीतला आहे, त्यातील ऐति-हासिक अंश बाजूला सारुन केवळ भाषेच्या सौंदर्याकडे लक्ष दिल्यास आपणास तत्कालीन मनोज्ञ अश्या शब्द रचनेचे दर्शन घडते. प्रस्तुत

लेखाची रचना रचनाकारांने पोवाडा छंदात केल्याचे दिसून येते.

१) शके १५७५ विजयनाम संवत्सरे आस्विमासे बहुले पंचमि स्थेमवा

२) र मृपासिरा (मृगशिरा) नक्षत्र वरियानो /०// सुहर सन सालासन प्रसैनवा ०/

३) ल फ ध १७ माहे जिलकाद रोज आलत्फात दिनें राजा शाहा

४) सुलतान माहामद आदलशाह पाद- शाहाना : त्यावरि पूर्ण क्र

५) पा असे सुराना: कोट संदलपूर अपलब नगिना : बाळाकिल मध्ये (बु)

६) नियाद शोधुन केली रचना : माह- मदखान पिरमाहामद जाबितखान हा

७) वालदार सुज्याणा : नजिक शाहा बुरुज वा दारुखाना तेंथे नबि मा

८) हामद बाई बांधिली वापि चौकोना : दोंनि तरफ सिडिकोटा सिहर

९) त करुन घेतले बहमाना : त्यासि सदा प्रसन्न आहे स्वामि रहिमाना : न

१०) जि बाई म्हणउनि लिहिले सासाना : त्याचा पाणि घेत जुमले ज्यांना याला.

१२) माचे हावाले होता दळपतरा गाविदरा (गोविंद) सरनाईक वाडि दौलत /०//

१२) हा मदीना :

ह्या लेखाचा रचनाकार किंवा ह्या पोवाडा छंदाचा कवि कोण हे त्या काव्या मधूनच स्पष्ट झालेला आहे. त्याचे नाव आहे नजि बाई (भाई) ह्या पूढील लेखाचीं रचना वा निर्मितीही त्याची असावी असे ते वाचल्या बरोबर ध्यानात येते.

१) (रा) जा आली येदिलशाह सुल- ताना : कोट सोनला

२) पुरासी रक्षे सुगना : तेथील नेघबा बाजी जाबित

३) खाना : केली अपरुब माहालाची रचना : मधे

४) पलग करुन हउदखाना : नवी प्रती म्हणउन लीही

५) ले सासाना :

किल्ल्यातील सर्वांत उंच अश्या हनुमान बुरुजावर हा द्वैभाषिक फरशी सारख्या बस- विलेला आहे. हयात अली आदिलशाह (१६५७- ७२) हा त्याचा एक पूवेकित अधिकारी जावीत खानाचा निर्देश आहे.

किल्ल्याच्या बाहेरील तटाच्या एका सजज्याच्या बाजूला एक लेखशिला आहे. हा लेख फारसी व मराठी अश्या मिश्र भाषांत आहे. त्याच्या वाचनाने त्याचा आशय स्पष्ट होईल.

१) बुर्ज कारकिर्द खुदाये

२) वदरवा वे अजम बर्गंभी

३) न गोसावि बुर्जा व व ब

४) यीमानिर्ब मुदति १ माहे २१

५) रोजाणी तेरीख १८ माहे सफ

६) र ईहदे खमसईन ता छ १०

७) माहे रबीलाखर ईदवे खम

८) सैन मोतंबु जाहाला शके १४६६

९) क्रोधी संवत्सरे आषाड मासे ते श बू

१०) र्ज मोतंबू जाहाला

शाह आलमगीरचा शिलालेख

हा लेख किल्ल्याच्या पुर्वेकडील आतील तटाच्या भितींत आहे. अंतर्गत पूराव्या वरून तो शाह आलमगीर (औरंगजेब) च्या काळातला आहे.

१) खैरहात शाह अलमगीर राजा म

२) नोहर खासजी गौड किलेदार किले
सो

३) लापूर हयाच्या अमलामध्ये हया
तरफ

४) ची अलंगजकोट कया होता तो
पका के

५) ला सन २४ विक्रम संवत १५
३५ // ६ //

वरील चारही लेख त्यातील ऐतिहासिक विवरणासहित प्रस्तूत 'लेखकाने संशोधन' हया आपल्या पुस्तकात प्रसिद्ध केलेला आहे -२

सोलापूरातील शुक्रवार पेठेतील जुम्मा मशीदीत अलीकडेच एक द्वैभाषिक लेख सापडला आहे. तो अद्यापी अप्रकाशित आहे. पोवाडा छंदातील ही रचना अली आदिलशाह (१ ला) च्या कारकीर्दितीलच आहे. त्याचा अधिकारी जाबितखान सुद्धा यात आहे. हा जाबितखान बादशाहच्या मर्जीतील आसामी दिसते. सोलापूरात हयाने अनेक इमारती, विहीरी, मशीदी बांधल्याची साक्ष पर्शियन आणि मराठी शिलालेखातून, आढळते. जुम्मा मशीदीच्या जवळच त्याचे शाही थाटातले थडगे आहे. त्या थडग्यावर त्याची थोरवी व कर्तृत्व वर्णन करणारे एक प्रदीर्घ पर्शियन लेखही आहे.

जुम्मा मशिदीतील शिलालेख

१) आर्शका अपूर्व रचना पेठ आदी
२) लापूर मासिद बांधलि गाहना.
३) आळीया बाग हौदरवा ना तैसेची
४) पाहा त्या आंबेयाच्या बना राजा
५) आळि आदीलस्या सुलताना त्या
६) चा नेयबा बाजी जाबीत रवाना
७) त्याने हे लिहीवीलें सोळा सासा
८) ना अचे पाडोनू आणा वेमना

लेखाच्या पार्शियन भागात हयाचा कालोल्लेख झालेला आहे. त्या प्रमाणे याचा काळ इ. स. १५७० असा येतो.

□□□

संदर्भ टिपा

१- **प्राचीन मराठी कोरीव लेख** - (संपा) तुळपुळ शं. गो. पुणे विद्यापीठ प्रकाशन, पूणे, १९६३ पृ. २६१ - ७०

२- कुंभार आनंद ना - **संशोधन तरंग** नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई १९८८ पृ. १७४ - ८४.

समारंभाच्या निमित्ताने अल्पशी भेट - स्मृति

गीत

करितो हे गीत
समजून जा तू माजी रीत :::
मागील जन्माचे तुझे ---
राहिले या जन्मी
मनात ठेव विचारु
नको करु अविचार :::
मिळेल तुला सदैव
श्रीमंतांचे दार
राहील सदैव प्रेमाचा आधार :::

कवि : सुधाकर राजाराम पोतदार,
पेण जि. रायगड

प्राचीन मुस्लिम मराठी साहित्यिक.

प्रा. अजीज नदाफ
सोलापूर

प्राचीन मराठी साहित्याचे यादव काल, शिव काल आणि पेशवे काल असे विभाजन करण्यात येते किंवा संत कवी संत कवी आणि तंत (शाहीर)कवी असे ही विभाजन करण्यात येते विशेष म्हणजे मराठी वाङमयाच्या प्रारंभा पासून मुस्लिम साहित्यिक ही मराठी भाषेची सेवा करीत असल्याचे आढळून येते असे अस– ताना ही मुस्लिम समाजावर ते राष्ट्रीय प्रवाहा पासून अलिप्त असतात असा जो आरोप कर– ण्यात येतो, तो इतिहासाच्या प्रकाशात खोटा आहे.

मराठीच्या विविध प्रकारामध्ये ही मुस्लिम साहित्यिकांनी रचना केल्याचे आढळते साधारणपणे पोवाडे, लावण्या, बखरी, रिवायतीं ओवी वाङमयात मुस्लिमांनी मराठी वाङमयात मोलाची भर घातली आहे.

साधरणपणे इ. स. १०५० ते १८५० हा काळ मराठी वाङमयाचा प्राचीन काळ मानला गेला आहे.

इ.स. १३४७ मध्ये महाराष्ट्रात बहामनी राज्याची स्थापना झाली पुढे त्याचे पाच तुकडे झाले त्यातील बिजापूरची आदिलशाही, अह– मदनगरची निझामशाही, बीदरची बरीदशाही आणि वऱ्हाडची इमादशाही हयांचा महाराष्ट्र– च्या इतिहासात एक सांस्कृतिक, साहित्यिक स्थान आहे केवळ राजकीय इतिहासाचे विकृती करण करुन या सांस्कृतिक ठेव्याकडे दुर्लक्ष झालेले आहे हे खेदाने नमूद करावे लागते.

वि. ल. भावे म्हणतात–

"शाहिरांचा जुन्यात जुना उल्लेख महिकावतीच्या बखरीत सापडतो" –१

ही बखर इ. स. १४४८ ते १५७८ या

दरम्यान लिहिली गेली आहे. तसेच श्री. प्रभाकर माचवे म्हणतात–

"इ. स. १५५५ मध्ये इब्राहीम आदिल शाह नी विजापूर दरबारात मराठी भाषा प्रचलित केली होती" –२

तसेच माधवराव पटवर्धन म्हणतात–

"विजापूर सरकारच्या फार्शी फर्मानात सुध्दा क्वचित स्थळी आसरा या सारखा मराठी शब्द सापडतो" –३

दक्षिणेतील मुसलमान बादशाहाविषयी आणि वाङमयीन प्रभावाविषयी मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड–३ मध्ये म्हटले आहे–

"हे दक्षिणेकडील राज्यकर्ते उत्तरेकडील आपल्या भाई बंदा इतके कट्टर वृत्तीचे नव्हते आदिलशाही राजवट तर अधिकच मवाळ होती मराठे सरदारांचे प्राबल्यही या राजवटीत अधिक होते." – ४

पुढे म्हटले आहे की, "ख्याल – गायकी आणि टप्पा, ठुंबरी, कव्वाली, गज्जल या सारखे गायनाचे विविध प्रकार, शायरीचे तंत्र इत्यादी बाबीही मराठयांनी मुसलमाना कडून घेतल्या." ५

या सांस्कृतिक समन्वयाचे, संगमाचे सखोल संशोधन होणे गरजेचे आहे डॉ. दु. का. संत म्हणतात, "वाङ मयाला इतिहास नसतो ते अक्षर, सदैव, समकालीन अखंड व विकासक्षम असा ज्ञान संचय आहे." – ६

राजकीस इतिहासकार अल्लाउद्दीन खिलजी (१३०४) पासून मुसलमान सत्तेची दक्षिणेत सुरुवात मानतात. परंतु त्याच बरोबर मुसलमानही याच कालात दक्षिणेत आले असावेत असा आभास निर्माण करतात. परंतू इस्लाम पूर्व काळापासून दक्षिण भारताचे अरब जगताशी संबंध होते. तसेच सिंध प्रांतात (इ. स. ७१२ मुस्लिम सत्ता स्थापित झाल्यानंतर दक्षिणेत अनेक सूफी संत आले. हाजी सूफी (११६०), सैयब शाह मोमीन आरिफुल्लाह (१२०२), बाबा शर्फुद्दीन (१२८८), बाबा शहाबुद्दीन (१२९१) बाबा फक्रुद्दीन (१२०४) आणि सय्यद अजीजुद्दीन (१२९९) ही त्यांतील महत्त्वाची संत मंडळी होत.

साधारण पणे इ. स. १४०० अखेरीस पहिले मुस्लिम संत कवी अलमखान (अलंप्रभु) हे नागेश पंथीय (वडवळ – सोलापुर) संत कवी होते. यांनी अभंग व पदांची रचना केली. ते म्हणतात.

"ज्ञानांजनें केला नयनी प्रकाश स्वयं ज्योती।
अंतर्बाह्य लखलखाटी उजळल्या दीप्ती ॥
"स्वानंदाचा भरपूर लोट झाला।
तत्क्षणी अलमखान बुडाला।"

त्यानंतर मुंतोजी खलजी (१४३५ – १५५०) हे महेन्द्राचार्यांचे शिष्य होते. त्यांनी विजय भैरव (ज्योतिष गंथ) आणि 'संगीत मकरंद' वर मराठीं टीका लिहीली.

हजरत लाडले मषायरव (आलंद १४६०-१५६०) हे एक प्रसिद्ध सूफी संत होते, गुजरात, महाराष्ट्र आणि आंध्र इत्यादि प्रांतात त्यांचा शिष्य परिवार होता. त्यांना राघवदराज, राघव चैतन्य या नावाने ही लोक ओळखत होते. मुस्लिम, जैन, लिंगायत ही त्यांच्या शिष्य परिवारात होते.

राघव चैतन्य, केशव चैतन्य, बाबाजी चैतन्य आणि संत तुकाराम अशी त्यांची शिष्य परंपरा आढळते. त्यांची इंद्रिय – दमन, ईशस्तवन, जितेपणी मरण, त्रिगुणलीला, निराकार मन, बुद्धि विकास, सनातन धर्म विचार, ब्रह–

मस्वरुप, माया आणि योग इत्यादि ग्रंथसंपदा आहे.

मुर्तुजा कादरी नारायणपूर (१४९७–१५७२) यांनीही एकेश्वर वादाची पताका फडकावाली. यांचा संबंध बीदरच्या राजघराण्यांशी होता. ते विषयलंपट होते नंतर त्यांना उपरती झाली सहजानंद (कल्याणी) यांचे शिष्यत्व त्यांनी पत्करले. नंतर त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराने सारा महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, प्रभावित झाला. शहा महमद बमणी, बहमनी पादशहा, शहा मुतबजी कादरी, मूर्तुजा कादरी ज्ञान सागरानंद, ज्ञानसागर अय्या, कादरी बेदरी पाच्चा, अय्या इत्यादी नावाने लोक त्यांना ओळखीत.

"शहा मुतबजी ब्रहमणी ।
जिन मे नहीं मना मनी ।
पंचीकरण का खोज किये ।
हिंदु – मुसलमान येक कर दिये।।"

असे त्यांच्या विषयी म्हटले जाते. त्यांच्या ।वषयी म्हटले जाते. त्यांच्या रचना खालील प्रमाणे होत.

सिद्धसंकेत प्रवंधर पद्म पूराणावर आधारिता अनुभवसार (अमृतसार), अद्वैत प्रकाश प्रकाश दीप, स्वरुप समाधान, अमृतानुभव जीवोद्धरण, गुरुलाल, पंचकिरण आणि काही अभंग व पदे. त्यांचा अभंग पहा –

"ऐसा पिंड ब्रहमांडीचा व्यापकु ।
साक्षरुप परमात्मा येकु ।
जनता तुटे कलंकु ।
सर्व पापाचा ।।",

या नंतरचे प्रसिद्ध साहित्यिक हुसेन अंबरखान होत (१६०३ – १६५३) त्यांनी गीतेवर ८७१ ओवी मध्ये आपले भाष्य लिहिले. ही काही सामान्य गोष्ट नाही. विशेष म्हणज त्यांचे पिता याकुत अंबरखान, आजोबा अंबर अंबरखान हे ही कवी होते.

त्यांच्या विषयी म्हटले गेले आहे की "म्लेंच्छ अंबरखान हा कालीयुगात देवाचा अवतार आहे." (श्री. वैद्यनाथ) त्यांच्या भाष्याचा नमुना पहा –

"मेलासि तरी स्वर्ग पावसी :
जिंकोनीं तरि वृथ्वी भोगसी ।
म्हणौनी कौंतया उठि युद्धासी ।
कृत निश्चये ।।" (गीता – १.४६)

सोळाव्या शतकातील सय्यद शाह, लतीफ शाह, शहा नवरंग, शेख सलीम हे ही प्रसिद्ध संत साहित्यिक होऊन गेले.

लतीफ शाह (लतीफ – लथीप – १६ वे शतक) यांची समाधी मंगळवेढे (सोलापूर) येथे आहे. त्यांच्या विषया महिपती म्हणतात.

"लतीब शाह मुसलमान ।
परमभाविक वैष्णवजन ।।"

त्यांच्या साहित्याचा नमुना पहा –

"आता पूजा कोठे वाहु ।
पाहता देहीच जाला देवू ।।"

राम, कृष्ण, विठ्ठल, अल्ला यांच्यात त्यांना एकच परमतत्त्व दिसले.

शहा नवरंग हे केशवस्वामींचे गुरु होते तर केशव स्वामी शाह बेग यांचे गुरु होते.

"जेथे मी – तू पणाचीं वार्ता सरते ।"

तसेच शेख सलीम हे ही मंगळवेढयाचेच होते. त्यांच्या एक कुट अभंगाचा नमूना बघा.

✓ " आम्ही जातीचे ब्राहमण ।
आमचे सोयरे मुसलमान ।
स्नान संध्या बोलविली ।
महारासि सोयरिक केली ॥
शेख सलीम महंमद भला ।
सुन टाकुनि सासुसी गेला ।
तिच्या पोटी कन्या झाली ।
ते फिरुन बाईल केली ॥

सतराव्या शतकात दादू पिंजारी, शेख मंहमद, हाकिम शेख, सैय्यद महंमद, वाजीद पठाण यांनीही मराठी भाषेची सेवा केली त्यात शेख महमद हे तर प्रसिद्ध संतकवी होऊन गेले त्यांना 'कबीराचा अवतार' मानतात. श्रीगोंदे (अहमदनगर) येथे त्यांची समाधी आहे ते कादरी संप्रदायाचे होतें मालोजीराजे भोसले हे त्यांचे शिष्य होते त्यांनीच हा मठ बांधून दिला १६६० मध्ये त्यांनी समाधी घेतली त्यांनी मराठी, उर्दू, हिंदी आणि फारसी मध्ये रचना केली आहे.

मुधा पांगूळ, दयाळदास, रघुनाथ योगी आजमशहा, दावल (पुत्र) त्यांचे शिष्य होते योग संग्राम, पवन विजय, निष्कलंक प्रबोध हे त्यांचे प्रसिध्द काव्य ग्रंथ होत या शिवाय त्यांनी रुपके, भारुडे, व अभंगाचीही रचना केली आहे.

" ऐसे केले या गोपाळे ।
नांही सोवले ओवळे ॥

" भाव तेसी सिद्धी । "
" ज्यासी रूप नांही देखा ।
तो अव्यभक्त माझा सखा ।
भावभक्तीचिया सुखा । साकारला ॥ "
" अद्वैती समरस । शेख महंमद ॥

इत्यादी नमुन्यातून त्यांचे भाषा प्रभाव दिसते

वाजिद पठाण हे आदिलशाही मधील एक सुभेदार होते नंतर ते केशवस्वामी (भागानगर-हैद्राबाद) यांचे शिष्यत्व स्विकारले मोरोपंत व महिपतीनी ही त्यांच्या विषयी गौरवद्‌गार काढले आहेत हकिम शेख हे शेख महंमदाचे नातू होते सय्यद महंमद यांनी गोपीच्या भूमिकेतून आपली काव्य रचना केली आहे तर दादू पिंजारी यांनी आपली रसाळ पदे विठ्ठल चरणी वाहिली आहेत.

अठराव्या शतकातही संत-साहित्याची ही परंपरा शेख सुलतान, आजम, जिंदो फकीर, दास फकीर, शहा हुसेन, शहा हुसेन फकीर, शेख दाजी यांनी चालविली.

शेख आजम हे शेख महंमदाचे शिष्य होते त्यांची एक आरती प्राप्त झाली आहे, जिंदो फकीरांनी अनेक पदे लिहिली होती, पण सध्या ती अप्राप्त आहेत दास फकीरांची ही तीच स्थितीं आहे शाह हुसेन (१८०८) यांची शहागड (जि बिड) येथे दर्गा आहे त्यांना शाहामुनी, शहासेन असेहीं म्हणतात त्यांचा " सिद्धांत बोध " ग्रंथ प्राप्त झाला आहे तर शहा हुसेन फकीर यांचे एक पद मिळाले आहे शेख दाजी उर्फ छोटु भाई हे शेख सुलतानचे धाकटे बंधु होते.

वास्तविक वारकरी पंथाचा एकतेचा सूर चांद बोधले उर्फ सैय्यद चाँद साहेब कादरी यांनी ही लावला ते सोळाव्या शतकातील सिद्ध पुरुष होत. त्यांना चंद्रभट्ट चंद्रशेखर असेही म्हणतात. महंमद गौस, राजे महंमद शेख महंमदाचे वडील) चांद बोधले, जनार्दन स्वामी आणि संत एकनाथ अशी ही शिष्य परंपरा आढळते शहादत अलंम प्रभु (१४७८-१५३८) दौलताबादला मुस्लिम घराण्यात जन्मले परंतु त्यांच्या विषयी दत्तावतार व मलंगावतार

एकच आहे असे गूढ आढळते त्यांचे संशोधन होणें गरजेचे आहे.

संत साहित्याच्या प्रवाहा बरोबरच मुस्लिम साहित्यिकांनी 'कर्बल्याच्या दुःखद' घटने वर 'रिवायती' (जंगनामे) लिहिले.
त्यात अब्दुल (कागवाड-सांगली), आबालाल करीम, काजी अहमद, कासम, गरीब अब्दुल, फतिशा, बाबन, बाबासाहेब, बुऱ्हानपाशा राजे बापू प्रसिद्ध आहेत.

तसेच लावणी वाङमयात सगनभाऊ (१७७८-१८५०) हेमहाराष्ट्रात प्रसिध्द आहेत अमृत फाजलखां हे सगनभाऊचे शिष्य होते.

" अमृत फजलखां कवि रंगेला ।
आठवतो हृदयी सगन भाऊला ॥ "

असे ते स्वतःची ओळख करुन देतात शेख सुलतान (१७६९) सातारा जिल्हयातील त्रिपूटी चे रहिवाशी ते ही शाहीर होते. पुढे उपरती झाली व त्यांनी गोपाळनाथचे शिष्यत्व पत्करले

"अरबी आणि फारसी शब्दाखेरीज दोन भिन्न मूल तत्त्वे मराठी भाषेत आहेत सिथियन (किंवा तुराणी) आणि संस्कृत मराठीचा आजचा प्रवेश पाहता तिच्यातले सिथियन तत्त्व अधिक प्राचीन आहे विशेषतः समाजाच्या खालच्या वर्गात आणि सामान्य जीवन व्यवहारात ते अजूनही पुष्कळ वावरात आहे." -७

त्याच प्रमाणें 'बखर-वाङमया' विषयी अधिक संशोधन होणें गरजेचे आहे "बखरींचे लेखनच मुळी फारशी तवारीखांच्या अनुकरणानें झालेले आहे. मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारीखा पाहुन मराठयांनीही बखरी लिहिल्या." -८

प्राचीन वाङमयाचे फक्त भक्ति साहित्य उपलब्ध आहे परंतू इतर साहित्य प्रकार मात्र उपलब्ध होत नाहीत या विषयी श्री. वर्वे म्हणतात --

"ज्ञानेश्वरानंतर महाराष्ट्रात मुसलमान सत्ता झाली तीनशे वर्षाचा काळ धाम-धुमीचा गेला त्या काळात कांही धार्मिक वाङमयाखेरीज इतर प्रकारच्या वाङमयाचे रक्षण झाले नसावे

ब्राहमणाखेरीज इतर वर्ग साक्षर नव्हता हिंदू धर्म कायम ठेवल्यानेच ब्राहमणांची श्रेष्ठता टिकावयाची होती त्यामुळें धर्मनिष्ठ अशा हिंदूची धर्मनिष्ठा कायम ठेवण्यासाठीच साक्षर ब्राहमण वर्गाला सर्व प्रयत्न करावे लागले त्यामुळे धार्मिक वाङमयाचा तेवढा बचाव होऊन इतर प्रकारचे वाङमय नष्ट झाले असावे" -९

आजही उपरोक्त दृष्टीत फारसा फरक पडलेला नाही सन १९८६ मध्ये " मराठी सारस्वत" हा ग्रंथ अनंत जोशी यांनी संपादित करुन प्रकाशित केला आहे त्याच्या १ ल्या खंडात १३७५ आधुनिक साहित्यिकांचा परिचय दिला आहे परंतु त्या मध्ये फक्त चार मुस्लिम साहित्यिकांची नोंद झाली आहे या,परिस्थितीनेच मला मुस्लिम मराठी साहित्य संमेलन भरविण्याची प्रेरणा दिली आहे मुस्लिम साहित्यिकांनी याची गंभीर नोंद घेतली पाहिजे व आपल्या संशोधनाच्या कक्षा आता मुस्लिमांनी रचलेल्या व रचत असलेल्या मराठी साहित्याचा विविध प्रकाराकडे विस्तृत करायला हव्यात

संदर्भ ग्रंथ

१) महाराष्ट्र-सारस्वत
वि. ल. भावे पृ. ९६६

२) मराठी और उस का साहित्य
पृ. २७

३) फार्शी–मराठी कोश
प्रो. मा. त्रि. पटवर्धन पृ. ४
४) मराठी वाङमयाचा इतिहास
सं. रा. श्री. जोग
खंड–३, पृ १८
५) उपरोक्त पृ. ३०
६) वाङमयींन विद्वता
डॉ. दु. का. संत पृ. ३६
७) मराठी भाषेचे मूळ
विश्वनाथ खैरे पृ. ७४
८) मराठी बखर वाङमयाचा पुर्नविचार
ग. ब. ग्रामोपाध्ये पृ. ११
९) मराठी कवितेचा उषःकाल किंवा
मराठी शाहीर– पृ. १७६
श्री. म. वर्दे

–०–०–०



सा. 'शबाब' गझल
स्पर्धेतील प्रथम पारितोषिक प्राप्त

भूकंप

◎◎◎

ऐकू कुणाचे मीं बरे ।
जो तो म्हणे माझे खरे ।।
ये वो हजारो वादळे ।
बांधू नवी आम्ही घरे ।।
बोलायचे ना बोलले ।
हे शब्द माझे लाजरे ।
माझ्या विनाशाचे दिवस ।
मी का करावे साजरे ।।
होती कुठे भूकंप अन् ।
बसती कुणाला हादरे ।।

अजीज हसन मुकरी.
जैतापूर (जि. रत्नागिरी)

समतावादी व ऐक्य प्रवर्तक पत्रकार.

हुतात्मा कुर्बान हुसेन

— प्रा. डॉ. नी. त्र्यं. पुंडे.



'मार्शल लॉ' ची पार्श्वभूमी

स्वातंत्र्य रक्षणाची लढाई सोलापूरने पाहिली ती १८१८ साली. गणपतराव पानश्यांनी जबरदस्त लढा दिला. शाहीरांनीं त्याची महती गायिली. १३ मे १८१८ ला किल्ला पडला आणि सोलापूरवर 'युनियन जॅक' फडकले, ते १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत! सोलापूर मराठयांच्या अगर पातशाहांच्या राजकारणाचा अगर राज्यकारभाराचा केंद्रबिंदू नव्हता पण या सर्वांच्या डावपेचांचा स्पर्शबिंदू निश्चित होता त्याची शक्ती या शहराच्या रणांगणात नेहमीच पणाला लागली शहराच्या सांस्कृतिक जीवनावर त्याचा सखोल परिणाम झाला स्पर्धेचा ताण स्पर्शबिंदूवरच आदळत राहतो राजकीय भूगोलाचा विचार करता राज्या राज्यांच्या सरहद्दीवरील स्पर्शबिंदूच महत्वाचे ठरतात.

व्यापारी मार्ग ही ह्या स्पर्शबिंदूना जोडत जोडत पुढे सरकतात, परिणामी बहुभाषिक बहुधार्मिक आणि आर्थिक असमतोल असणारा साचेबंद व्यवसाय करणारा समाज अस्ताव्यस्त रुजतो, वाढतो आणि स्थिरावतो अर्थातच अशा समाजाच्या संवेदना भिन्न भिन्न पातळी दर्श-वितात एका बाजूस स्वकीय शासनाचा पराभव दीर्घकाल सलत राहिला तर दुसऱ्या बाजूला परकीय सरकारला 'मा-बाप' म्हणून मान्यता ही लवलाहीने मिळाली! नगरपालिका, युनि-यन क्लब, कापड गिरण्या, साप्ताहिकें इत्यादी घटक नव्या राजवटीच्या लाभाची जाळयाची प्रतीके आहेत तर सोलापूर सार्वजनिक सभेची स्थापना, तिचे 'पीपल्स असोसिएशन' उर्फ लोकसभा असे नवे नामकरण आणि पुढे राष्ट्रीय कॉंग्रेस मध्ये संम्मीलन इ. जाणीवेचा दुसरा पदर दाखवितात लोकमान्यांच्या मृत्यूपर्यंत जाणीवेचा पोत समधात होण्यास चांगलीच चालना मिळाली होती कांग्रेसचा एक संस्थापक मि. ह्यूम सोलापूरच्या गिरणी कामगारांसमोर चार शब्द हिंदीतून बोलून गेला होता त्यामुळे नवशिक्षित समाजाबरोबरच येथील मजूर समाजाला पारतंत्र्याची खंत लागलेलीं होती. गिरणी-स्वदेशी मालकांची कापड गिरणी, हा मजूरांच्या जागृतीतील आणि पर्यायानें शहर-वासियांच्या जागृतीतील फार मोठा कारक घटक आहे गिरणी ने वर्गीय तफावत अधोरे-खित केली 'युनियन' ही मजूर संघटना माग-त्यांच्या माध्यमातून अन्याय निवारणच्या प्रयत्नातून येथील सामाजिक व म्हणून राज-कीय जीवनाचा मूलभूत घटक झाली गिरणीने संपाचे 'हत्यार' नुसते 'परिचितच' करून दिले असे नाही तर ते वापरण्याचा सरावही करुन घेतला! परिणामी पांढरपेशांचे बरोबर सामान्य समाजही स्वातंत्र्य लढयांत उतरला गांधीजी-च्या हाकेला येथील समाजाने भरीव 'ओ' दिली! विशेषत: १९२५ ते ३० या पांच वर्षात जागृतीचे स्वरूप कृतीपरायण झाले सत्याग्रहीला वर्गीय वा जातीय वा धार्मिक 'लेबल' नव्हते सोलापूरात १८७१ म्हणजे सोलापूर सार्वजनिक सभेच्या स्थापनेपासुन तो १९२० पर्यंत चळ-वळींनी खूपच मजल मारली होती. रानडे-गोखले-टिळक या बदलाची प्रेरणा होते गांधी जींच्या सत्याग्रहामुळे उफाळून येणाऱ्या कृति-शीलतेच्या उर्मीला वाट सापडली येथील वर्त-मानपत्रांना जहाल व मवाळ अशी दोन्ही रुपे समाजापुढे ठेवली रामभाऊ राजवाडयांचा 'कर्मयोगी' आणि कुर्बान हुसेनचा 'गज़नफर' तर शब्दांचे अंगार उधळीत होते. भाषा हे त्यांचे 'हत्यार' होते काकडयांचा 'कल्पतरू' आणि जक्कलांचा 'समाचार' 'सौम्य व मवाळ' मार्गाची भलावण करीत होते या साऱ्यातून एक स्फोटक रसायन निर्माण होत होते आणि सोलापूरचा 'मार्शल-लॉ' त्याचा प्रचंड विस्फोट होता.

० प्रेरणा व प्रकृति ०

त्या विस्फोटातील एक आहुती होती श्री कुर्बान हुसेन यांची ! एका 'गज़नफर'ची! कुर्बान हुसेन हे हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केलेले गिरणी कामगार होते स्वातंत्र्य चळवळीत ते अग्रभागी होते तत्कालीन वर्तमान पत्रांचे अंक चाळता मोर्चे-मिरवणुका, निरोधने सभा, यांतील त्यांचा सहभाग उठून दिसतो त्यांनीच त्यांचे मामा श्री एम. बी. पठाण यांचे सहकार्याने 'गज़नफर' म्हणजे 'सिंह' हे साप्ताहिक १९२८ मध्ये सुरु केले ते मार्शल लॉ चे कारवाईत बंद पडले.

म्हणजे गजनफरचे आयुष्य जेमतेम २॥–३ वर्षाचे आहे पण अल्पकाळांत ते विजेसारखे चमकले. श्री. पठाण हे ही उत्कृष्ट मराठी लिहित त्यांच्या कथा 'चित्रमय जगत' मध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. १२ जानेवारी १९३१ मध्ये श्री. कुर्बान हुसेन यांना फाशी दिली आणि ह्या वृत्तपत्राची इतिश्री झाली. स्वातंत्र्य लढयाँत श्री धनशेट्टी, श्री. सारडा, श्री. शिंदे आणि श्री कुर्बान हुसेन या चार हुतात्म्यांनी सोलापूरचे नाव अजरामर केले तसेच मराठी वृत्तपत्र सृष्टीत 'गजनफर' ने नांव कमविले आहे. कुर्बान हुसेन एक गिरणी कामगार होता बुध्दिमान होता, उत्तम वाचक होता, कार्यकर्ता होता त्याची सामाजिक प्रश्नांची 'जाण' चांगली होती अन्यायाची त्यास चीड होती, निष्ठची प्रामाणिक पणाची चाड होती. त्यास ब्रिटिश सरकारला भिण्याचे कांही कारणच वाटत नव्हते. शिक्षेची भिती नव्हती. कष्टाची तमा नव्हती. 'भेटेन नऊ महिन्यांनी' ही खात्री असल्याने मातृभूमीच्या सेवेसाठी प्राणाँची बाजी लावण्यात काडीमात्र कुचराई नव्हती. !

त्याची प्रेरणा किती कसदार होती, कृती किती दमदार होती, मनाची तळमळ आणि हृदयाची आग किती धगधगती होती ते 'गजनफर' मधील लेख वाचताना चांगलेच जाणवते. 'पुनरागमन' हा अग्रलेख वानगी दाखल पाहणें योग्य ठरेल. सर्व शक्तिमान 'इलाही'च्या कृपा प्रसादाने आजला 'गजनफर' पुनरपी समाज सेवेच्या पवित्र आखाडयांत उतरतो आहे. समाजसेवा आणि लोक शिक्षणाच्या पवित्र हेतूने जन्मास आलेल्या गजनफरला दुर्दैवाने कांही काळ आपला उदात्त हेतू बंद ठेवावा लागला होता ---- जन्मतःच गर्भश्रीमंत नसल्यामुळे लोकजागृती व लोक शिक्षणाच्या अनेक कल्पना मनोराज्य ठरल्या ---- लोकसेवेची तळमळ गजनफरच्या सात्विक हृदयाला लागली आहे ---- 'पाकपरवरदिगार' ने लोकसेवेची संधी पुन्हा दिली आहे --- धार्मिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक प्रश्नांची सडेतोड चर्चा करतानां तो कोणाच्याही धाक दपटशाला किंवा आमिषाला भीक घालणार नाही, हे पुन्हा जाहीर करण्याला गजनफरला अभिमान वाटतो. धार्मिक बाबतीत तो पूर्णसहिष्णू राहीला तरी परधर्मियांनी त्याच्या धर्मावर उडविलेले शितोंडे तो नामर्दांप्रमाणें सहन करणार नांही पूर्वीच जाहीर झालेल्या 'गजनफर'च्या समतावादी व ऐक्य प्रवर्तक ध्येयाला पोषक अशा प्रत्येक राष्ट्रीय चळवळीला तो केंव्हांही उचलूनच धरला! आजला राष्ट्रात सुरु असलेल्या राष्ट्रीय आंदोलनात तो आपल्या परीने भाग घ्यायला मुळीच कचरणार नांही.

मजूर शेतकरी व तरूण या निरनिराळया वर्गाच्या जागृतीमुळे राष्ट्रीय चळवळ अनेकांगी झाली हे सुचिन्ह आहे. गतवर्षी गजनफरने तरुणवर्गाला त्याच्या सुप्रावस्थेतून जागविण्याचा अटोकाट प्रयत्न केला हे जनतेला पूर्ण माहीत आहे वर्षापूर्वी केलेल्या प्रयत्नाला इतक्या लवकर फळ आलेले पाहुन त्याला कां आनंद होणार नांही? ---- मजूर वर्गाच्या चळवळीत गजनफर दीन दुबळया मजुरांचीं गाऱ्हाणी जनतेपुढे मांडून त्यांची बाजू राखली! मजूर बंधूच्या खऱ्या गाऱ्हाण्याची दाद लावताना तो मालक व मजूर यांचे परस्पर विषयक नाते आपूलकीचे आणि प्रेमाचेच ठेवण्याचा प्रयत्न करील. राष्ट्राच्या उन्नतीसाठी मालक आणि मजूर वर्ग --- मग तो गिरणीच्या आवारातील असो किंवा शेतीच्या कुंपणामधला असो

-- या दोघांची ही राष्ट्राला सारखीच जरुरी आहे हे 'गजनफर' केंव्हा ही विसरणार नांही

मजूर, शेतकरी, तरुणवर्ग आणि मुसलमान समाज यांची सेवा करण्याची आहे म्हणूनच 'लोक समाजाला व राष्ट्पुरुषाला' तो अस्सलाम अलैकुम करीत आहे ! "

० कामगार जागृती ०

'शेरे आणि ताशेरे' ह्या सदरातील विचारांचा, व भाषेचा नमुना लक्षणींय आहे " येथील एका गिरणीतून मजुरांनी संघाचे सभासद होवू नये -- पोटासाठी देखील संप करु नये अशा अटीवर त्यांना कामावर घेण्यात येते आणि या अटी केंव्हाही मोडल्या जाऊ नयेत म्हणून गिरणी मालक शेकडो व हजारो रुपयांचे कागद प्रामिसरी नोटीच्या रुपाने अथवा अन्य तऱ्हेने घेत असल्याचा बराच गवगवा ऐकु येत आहे. शेतकरी व सावकार यांचे संबध नियमित करणारा कायदा सरकारने केला आहे. तसाच येथे 'मां-बाप' सरकार ने करावा --- पोटाला भरपूर मिळत नसेल तरी पोटाला घडया घालून गरिब कामगारांनी आमची चाकरी केलीच पाहिजे अशी निर्दयी मनोवृती भांडवल शाहीची जननी आहे. म्हणूनच या राक्षसी अवलादीला सरळ करण्यासाठी परमेश्वराने मजूरांचे हाती शांततेच्या 'संपाचे हत्यार' दिले आहे. परमेश्वरावरही मात करण्यासाठी भांडवलशाहीने ही सैतानी मुस्कटदाबी चालविली आहे तेंव्हां परमेश्वराच्या कायद्याची अमलबजावणी करण्यासाठीच जगातली सरकारे अस्तित्वात आलेली आहेत गरीब दीन दुबळयांचे अमोलिक व्यक्ति स्वातंत्र्य आमचे सरकार मातीला मिळू देईल काय?

मजूर बंधूनो ! तुम्ही पण लक्षात ठेवा की असले जुलूम आणि असले निर्दय छळ सहन करण्यातच तुमचा विजय होणार आहे तपश्चर्या पूर्ण झाल्याशिवाय फळ मिळत नसते!

० एकात्म दृष्टि ०

आणखी एक निवेदनाचा नमुना पहा " जाहीर विनंती -- राष्ट्रीय सभेच्या आज्ञे प्रमाणें रविवार ता. १० मार्च आणि पुढील प्रत्येक रविवारी लोकहित प्रेरक आणि लोकमत निदर्शक कार्यक्रम आखून तो एकमताने पार पाडण्यासाठी स्थानिक कार्यकर्ते, सार्वजनिक संस्थांचे चालक आणि प्रत्येक पक्षोपक्षाचे पुढारी यांनी आज शुक्रवार ता. ८ रोजीं रात्री ८॥ वाजता शेठ हरिभाई देवकर्ण यांच्या वाडयात विचार विनिमय करण्यासाठी अवश्य यावे अशी ता काँ. कमिटीचे चिटणीस श्री. राठी व महाजन वकिल विनंती करतात"

० लेखणीचे लालित्य ०

वरील नमुने काळजी पूर्वक वाचता विचार आणि भाषा यांचा समसमासंयोग झाल्याचे आढळते. शब्दांची निवड लेखकाची भावना नेमकी व्यक्त करते वाक्य रचना अपेक्षित परिणाम साधणारी आहे कुर्बान हुसेन यांच्या 'गजनफर' ची भाषा प्रौढ, प्रगल्भ, कायद्याच्या मर्यादा ओळखणारीं आणि तरींही प्रहार करण्याची आहे. एका मराठी भाषिक मुस्लिमाने गिरणी कामगार असणाऱ्याने स्वातंत्र्य लढयाची ज्योत वर्तमान पत्रा द्वारे पेटविली ती पाहून आजही वाचक प्रभावित होतो इ नमुने वाचणाऱ्यास वेगळं सांगण्याची जरुरी नाही!

आधुनिक मुस्लिम मराठी गझलकार.

– अंजूम मोमीन, सोलापूर

फार्सी भाषेतील गझल हा काव्य प्रकार मुस्लिम सूफी पंथियांकडून इराणमधून भारतात आला आज मराठी साहित्यात 'गझल' हा काव्यप्रकार तिच्या काटेकोर आकृतीबंधामुळे अवघड वाटत असला तरी गझलेचा सखोल अभ्यास आणि नियमित सराव केल्यास मराठी गझल म्हणावी तितकी अवघड नाहीच.

कवीच्या भावनांना हुबेहुब प्रतिंबिबीत करणारा गझल हा एकच साचेबध्द, रेखिवाकार आरसा आहे गझल लिहताना येणारी बंधने, तंत्र यांची पुरेशी माहिती नसल्याने नवोदित कवींना अपयशामुळे हा प्रकार आवडत नसला तरी गझलेने वृत, मात्रा, रदिफ, काफिया यांचे पहारे स्विकारल्याने गझलकारांना रसिकांकडून कमालीची दाद मिळू लागली. गझल तंत्रशुध्द असल्याने तिच्यात गेयता आणण्याचा खटाटोप कवीला करावा लागत नांहीत सहज प्रयत्नांनी गझलेत गेयता अपोआपच येते. एका कवितेचा आशय एकाच 'शेर' मध्ये सांगणाऱ्या गझलेच्या लोकप्रियते बरोबरच तिला विरोध करणाऱ्या अज्ञानी नव-गझलकरांची संख्याही वाढू लागली पण सिध्दहस्त गझलकारांनी या सर्व वाटा तुडवित मराठी साहित्यात मोठया रुबाबाने गझलेचे स्थान टिकवून ठेवले आहे ही गोष्ट मात्र मान्य करावीच लागेल.

'मराठी साहित्यात मुस्लिम गझलकार' या विषयी विचार करताना एक गोष्ट येथे उघडपणे स्पष्ट करणे अपरिहार्य ठरेल ती म्हणजे मराठी गझल आज असंख्य मुस्लिम गझलकार लिहित आहेत या सर्वांच्याच गझ-लांचा स्वैरस्वाद करणे म्हणजे या लेखाला घालून दिलेल्या शब्दमर्यादेचे उल्लंघन केल्या-सारखेच होईल म्हणून महाराष्ट्रातील काही प्रतिभावंत अशा मुस्लिम मराठी गझलकारां-च्याच गझलांची समीक्षा येथे करीत आहोत.

गझलेच्या शेवटच्या शेर मध्ये स्वतःचे नामनिर्देश (तखल्लुस) चपलखतेने व्यक्त करण्याची पध्दत म्हणजे 'मक्ता' आज मराठी गझलेत ज्या मुस्लिम गझलकाराचे नाव महा-राष्ट्रास परीचीत आहे असे दापोली रत्नागिरी चे कवी खावर 'तखल्लुस' ची पध्दत आणणारे मराठीतले पहिलेच गझलकार असावेत. तख-ल्लुस हे गझलेचे वेगळेपण असले तरी गझलेतून समर्पक भावनाना बिनचूकतेने अभिव्यक्त करणे हे आवश्यकच असते. हीच द्वंद्व अनुभूती खावर यांच्या गझलेत जाणवते --

झोपलेला लाडका 'खावर' तुझा आहे इथे
दोन या थडग्यावरी ताजी फुले वाहुन जा

किंवा

'ही तुझ्यापुरतीच रे 'खावर' जगाची वादळे
एकदा गेलास की थांबेल हे काहुरही'

मुखड्यात मुखडे लपवून आरशा समोर निर्भयतेने वावरणाऱ्या समाजातल्या बहाणेबाज दांभिक बहुरुप्यांना पाहून कवी खावर यांची लेंखणी अचूकतेने प्रहार करते---

'कोठुनी डोळयात ह्यांच्या आज आली
-आर्द्रता
जाहली दिलदार केंव्हा माणसे निष्ठूर
-ही?'

मनामनात दिवसेदिवस गर्द होत जाणारा अंधार ही कवीला बे-चैन करुन जातो आणि मग दिव्यांना न शोधण्याचा 'अनैसर्गिक' सल्ला कवी खावर नाइलाजाने देतात---

'शोधतो आहेस ज्योती काय वेड्यासारख्या
शांत झाला दीप आता राहिला ना धूर ही'

कवी बदीउज्जमान खावर यांचे 'गझलेत रंग माझा' व 'माझिया गझला मराठी' हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

मराठी गझलेच्या प्रांतात मुक्तपणे भराऱ्या मारून महाराष्ट्रात आपल्या एका आगळया लेंखनशैलीने सर्वपरीचीत झालेले सोलापूरचे तरुण मुस्लिम मराठी गझलकार मुबारक शेख यांनी राज्यपातळीवरील गझल लेखन स्पर्धेत वरच्या क्रमांकाची जवळ जवळ शंभराच्या वर पारितोषिके पटकाविली आहेत. ही गोष्ट मराठीतील तरुण गझलकारांना स्फूर्तीदायी अशीच आहे.

दुःख, व्यथा, वेदना, पीडा, विरह हे मुबारक शेख यांचे गझलेचे जिव्हाळयाचे विषय त्यामुळे त्यांची लेखणी गझलेला 'यातना' देण्याचे विसरलेली नांहीं.

'मेंदी' सारख्या मनाला उल्हसित करणाऱ्या हळूवार, मृदू 'पारपर्शी गजलेतही-

'चिता जेव्हा धडाडली माझी
तुझ्या अश्रूत नाहली मेंदी'

हा शेवटचा शेर लिहताना त्यांची लेखणी अश्रूच सांडतेय की काय असे वाटते वेदनेनं या गझलकाराला जन्माला घातले आहे की कसे हेच आकळत नांही. गझलेत व्यथा, पीड, यातना पोटतिडकीने व्यक्त करण्याचा मुबारक शेख यांचा स्थायीभाव असला तरी समाजातील रक्तरंजीत अत्याचार, विस्कळीत समाजरचना आणि लोप पावत जाणारी माणुसकी त्यांच्या गझलेत जशीच्या तशी प्रतिबिंबीत झालेली आढळून येते.

'आता प्रेषितांना विचारी न कोणी
निधर्मी खुन्यांची नवी जात आली'

शहरा - शहरात, आणि गजबजलेल्या वस्तीत मादक पदार्थांनी जागोजागी मृत्यूचे सापळे रचून ठेवलेत हे आजच्या मदहोश तरुण पिढीला सांगणार कोण?

मुबारक शेख मग अस्वस्थ होतात - डोळयांसमोर स्मशानात बदलणारं गाव निमूटपणे पाहतात---

'कोणास याद आहे कोणास भान आहे
येथेच गाँव होते जेथे स्मशान आहे'

प्रेमाची परीकल्पना प्रत्येक कवीच्या हृदयात वेगवेगळी रेखांकित झालेली असते. प्रेमाचीं अनुभूती गझलकारास जशी सुवासिक झुळूक भासते तशीच ती कधीकाळी झंझावात वादळही वाटते म्हणूनच मूळचे दूधगाव, सांगलीचे पण सध्या पुण्यात वास्तव्यास असलेले प्रसिध्द गझलकार इलाही जमादार आपल्या

'प्रवास' या गझलेत म्हणतात--

'मी माळले तुलाही हृदयात खोल माझ्या
बघ लेखणीस माझ्या येतो सुवास आता'

नजरानजर झाल्यावर उरात उठणारं वादळही 'इलाही' ला प्रिय आहे--

'भ्रमराच्या कानात कुजबुजे फुल उमलते
-तुझ्याचसाठी आजवरी मी जपले वादळ'

वर्षानुवर्षे चालत आलेला शोषणाचा सिलसिला पाहुन इलाही जमादार रक्तपिपासू अमानुषांना आपल्या गझलेतून समर्पक जबाब देतात--

'बंद पडल्या कालच्या त्या पाणपोया
माणसांचे रक्त आता स्वस्त आहे'

खावर यांच्या प्रमाणेच मक्त्यात तखल्लुस चा वापर इलाही जमादार यांनी आपल्या अनेक गझलात केलेला दिसून येतो. 'एक होता बिरबल' या शैक्षणिक व्हिडीओ कॅसेटसाठी व अनेक संगीत नाटके आणि नृत्य नाटके यांच्या साठी त्यांनीं गीत रचना केली आहे.

आपल्या संवेदनाक्षम कवितेसाठी प्रसिद्ध असलेले मूळचे नगर जिल्हयातले सद्या मनमाड ला स्थानिक असलेले खलील मोमीन यांची 'मीच माझ्याशी' ही गझल वाचताना या कवीला कुठल्याही रंगात रंगावेसे वाटत नसावे किंवा स्वतःच आत्ममग्न असणाऱ्या या कविला एकांत प्रिय असावा असंच वाटते आणि 'गझल कवीच्या आईना असते' हे ही खरंच!

'मैफलीत रंग चढता धुंद झालो ना कधी
शुष्क गजरे मनगटाला माळनी आलो इथे'

असे असले तरी मुक्या हुंदक्यांना दिलासा देण्या इतकं बळ या कवीमनात निश्चित आहे--

'फूल' हा विषय तसा हळवा, हलका आहे. फूलं आणि आठवणींना घेऊन आपल्या एका गझलेत खलील मोमीन यांनी परस्पर विषयांचा विरोधाभास किती सुस्पष्टपतेने मांडला आहे पहा-

'हुंगून गंध गेली निर्माल्य फूल झाले
आता कशास यावे उमलून आठवांनी'

खलील मोमीन यांचा 'निरालय' हा काव्यसंग्रह प्रसिध्द आहे.

आज या दुनियेत कोणतीही चीज 'विकाऊ' बनलीय हे नाकारुन चालणार नांही 'ओंजळ' या आपल्या पहिल्या-वहिल्या काव्य-कृतीस राष्ट्रीय पुरस्कार लाभलेले पनवेलचे कवी अे. के. शेख जगातल्या बाजारूपणाचे दर्शन घडविताना आपल्या 'जुलूस' या गझलेंत म्हणतात--

'विकावयास जसे निघाले मलाच सारे
जिवाशिवाचा सखाच माझ्या दलाल होता'

सामाजिक विषय अे. के. शेख यांनी आपल्या गझलेंत चांगला हाताळल्याचे दिसून येते.

'आधुनिक मुस्लिम मराठी गझलकार' हा लेख पूर्ण करताना इच्छा असूनसुही प्रतिभावंत मुस्लिम मराठी गझलकार जैतापूरचे अजीज हसन मुकरी, यांचे साहित्य ऐनवेळी उपलब्ध झालें नसल्याने त्यांच्या आशयगर्भ गझलांचा आदरपूर्वक सन्मान करुन ही लेंखणी ना-इलाजाने खाली ठेवावी लागत आहे याचीं मनोमनी खंत वाटते.

□□□

अध:पात

आचार-विचारांची झालीया फारकत ।
माणसाने माणसाला केलय उध्वस्त ।।
बीजे अनाचाराची पेरली शेतात ।
भरघोस पिके, जागोजागी दिसतात ।
सोडले ना देऊळ, ना सोडली मशिद ।
कारस्थानाला त्यांच्या जागा नाही पुरत ।
धर्माच्या नावाने माजलय थैमान ।
राजकारणी धुमाकूळ घालतायत ।।
ज्वालामुखी सदा तो संतप्त ।
निष्पाप जीव झालीत स्वस्त ।।
हे आहे माझे आणि ते नाही तुझे ।
तुझ्या माझ्या तंटयाचा कधी होईल अस्त? ।।
देशोधडीला लागली, कित्येकांची घरे ।
याची त्याला थोडेही, वाटे ना खंत ।।
शारदे! कर विश्वनाथाचे प्रतापी हात ।
थांबवण्यास, माणूसकीचा अध:पात ।।

प्रा. सौ. फातिमा मुजावर, ◘ पनवेल.

धुंदीत रंगलेल्या

धुंदीत रंगलेल्या बेभान त्या क्षणांची
येते अजूनी याद प्रिती तुझ्या सवेची!
डोळयात आसवांचा घेऊनी विरद सागर
उत्कंठ भाव बघशी तू वाट जीवलगाची!
नयनात मूक भाव भाषा जणू प्रितीची
देऊ कशास उपमा गालातल्या खळीची!
अव्यक्त भावनांनी येता उरात भरती
लाजून बोलणें ते कि बोली लाजरीची!
स्मरतो अजून ही तो दिन तापत्या उन्हाचा
भेटीस प्रियकराच्या अनवाणी धाव घेशी!

शफी शहादवी, ◘ धुळे

लक्ष्मण–रेषा भारताची.

–०–०–०

रेषा ही लक्ष्मणची तुम्ही,
आज ओलांडता कशाला ? ।
भारत–रुपी सीतेला या,
विनाकारण त्रास देता कशाला? ।।
आहो कोटी कोटी लोकांचे हे,
पाहा कोटी कोटी हात ।
उठतील एक होऊनी मग,
घेऊनी तिरंगा हातात ।
शांत झालेल्या राखेत या
तुम्ही हात घालता कशाला ? ।।
जातीय दंगे असोत,
वा पंजाब समस्या आमुची ।
सज्ज आहोत आम्ही सर्व सोडवाया,
सरकारही आहे आमुची सज्ज ।
कुसळ आपल्याच डोळयात,
मग दुसऱ्याकडे पाहता कशाला ?।। –२
म्हणोनी भारत माता की जय,
एक होतील सर्वं जेंव्हा भाऊ भाऊ ।
आहो बळ हे एकीचे मग,
पाहत राहतील तेंव्हा चाऊ मांऊ ।
हिंद–पुत्र रुपी नागाच्या या बीळात,
तुम्ही हात घालता कशाला ? ।। –३

पठाण हमीदुल्ला खान
सेलू–४३१५०३

मुस्लिमांची मराठी साप्ताहिके.

अल्नासिर काझी
रत्नागिरी.

प्रसार माध्यमांना आधुनिक युगात महत्वाचे स्थान आहे लोकशाहीमध्ये वृत्तपत्र हा चौथा प्रमुख आधारस्तंभ मानण्यात येतो जनमानसाच्या विचार प्रकटी करण्याचे वृत्तपत्रे हे एक प्रभावी माध्यम आहे. त्याचप्रमाणें समाज प्रबोधन ही वृत्तपत्राची प्रथम जबाबदारी मानण्यात आली आहे.

व्यक्तीच्या जीवनात वृत्तपत्रे, नियतकालिके ही आता एक आवश्यक गरज बनली आहे. वृत्तपत्रे ही पर्यायाने त्या समाजाचे ही प्रतिनिधीत्व करीत असतात एखादा विशिष्ट समाज, त्याचा वारसा, इतिहास आणि संस्कृती याची ओळख वृत्तपत्रांमुळे सहजसाध्य होते. एखाद्या समाजाच्या वेदनांना वाचा फोडण्याचे कार्यंही वृत्तपत्रामुळे पार पाडणें शक्य होते. आपला भारत देश विविध धर्मिय समाज बांधवांचा समुच्चय असून येथील विविध समाजाच्या आशा-आकांक्षा व विचारांना प्रतिबिंबीत करुन समाज प्रबोधनाबरोबरच राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे दृष्टिने वृत्तपत्रे फार महत्वाची भूमिका बजावित आहेत.

▣ मुस्लिमांची वृत्तपत्रे ▣

महाराष्ट्रातील एकुण लोकसंख्येत मुस्लिम अल्पसंख्याक समाजाची एकुण संख्या सुमारे १२ टक्के आहे देशाच्या पर्यायाने राज्याची जडणघडण व उभारणीत महाराष्ट्रीयन मुस्लिमांचीही लक्षणीय वाटा आहे अर्थात हा समाज अल्पसंख्याक म्हणून गणला जात असल्याने त्याच्या वाटयाला शोषण, अन्याय व बदनामी अपोआपच येत असतें त्या दृष्टिने समाजावरील अन्याय आणि शोषणाविरुध्द आवाज उठविण्याचे महत्वाचे कार्य या समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या या वृत्तपत्रांकडून होणें क्रमप्राप्त आहे.

मुस्लिम समाजाची स्वतःची अशी संस्कृती आहे. गौरवशाली इतिहास आहे हा समाज भारतीय संस्कृतीशीही एकरुप झालेला असला तरी या समाजावर शिंतोडे उडवून मुस्लिम समाज व त्याची संस्कृती बदनाम करण्याचे प्रयत्न इतर जातीयवादी वृत्तपत्रांकडून जाणून बुजुन केले जातात. अशा या भांडवलधारी वृत्तपत्रांच्या जातीयमूलक विचारांचे विच्छेदन करुन वाचकांसमोर सत्य मांडण्याचे कार्यं मुस्लिम वृत्तपत्रांना पार पाडावयाचे असते.

महाराष्ट्रातील वृत्तपत्रसृष्टीत मुस्लिमांकडून चालविण्यात येणाऱ्या वृत्तपत्रांमध्ये उर्दू दैनिकें व साप्ताहिकांची संख्या मराठीच्या तुलनेत अधिक आहे मात्र मराठी ही राज्याची प्रादेशिक भाषा असूनही मराठीतून मोजकीच

वृत्तपत्रे प्रकाशित होत आहेत. राज्यातील मुस्लिम समाज हा जसा शैक्षणिक दृष्टया मागासलेला आहे तसा तो आर्थिक दृष्टयाही फारच पिछाडीला आहे लक्षावधी रुपयांचे भांडवल गुंतवून मराठीत दैनिक चालविणे व्यवहारिक दृष्टया तितकेसे लाभदायी नसल्याने मुस्लिम पत्रकारांचा कल साप्ताहिक चालविण्याकडेच अधिक झुकलेला दिसतो.

समाजावरील अन्यायाला वाचा फोडणें समाज प्रबोधन साधणें, समाज, धर्म, संस्कृती यावरील टीकेचा परामर्श घेऊन बहुसंख्याक समाजात पसरविण्यात आलेले गैर-समज दूर करुन परस्पर विश्वास निर्माण करुन राष्ट्रींय एकात्मतेस पोषक ठरणारे वातावरण तयार करणें आदी प्रमुख कार्ये आणि ती ही आर्थिक अडचणींना तोंड देऊन या साप्ताहिकांना पार पाडायची असतात याचाच अर्थ मुस्लिम मराठी प्रकाशक व संपादकाना कोणत्या दिव्यातून जावे लागत असेल त्याची केवळ कल्पनाच केलेली बरी!

महाराष्ट्रात मुस्लिमांकडून चालविण्यात येणाऱ्या मराठीं वृत्तपत्रांमध्ये पाक्षिक शांतिमार्ग. मिरज, साप्ताहिक शोधन, मुंबई व साप्ताहिक आकाशगंगा रत्नागिरी/कोल्हापूर यांच्या प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या तीनही वृत्तपत्रांची उद्दिष्टये वेगवेगळी असून आता आपण या वृत्तपत्रांचा थोडक्यात परिचय करुन घेऊ.

मुस्लिम मराठी वृत्तपत्रांचा परिचय

'शांतिमार्ग' हे मराठी पाक्षिक गेली १७ वर्षे नियमितपणें प्रकाशित होत आहे. मुस्लिम तसेच मुस्लिमेतर बांधवाना मराठी भाषेतून इस्लाम धर्मांची माहिती उपलब्ध करुन देणें हे उद्दिष्ट या पाक्षिाचे असल्याचे दिसून येते. जनाब अ. जब्बार कुरेशी हे या पाक्षिकांचे संपादक असून त्यांचे समर्थ लेखणीतून उतरलेले अग्रलेख वाचकांना विचार करण्यास अंतर्मुख करतात मराठीतून इस्लाम धर्माविषयीची माहिती प्राप्त करुन घेऊ इच्छिणाऱ्या जिज्ञासूना शांतिमार्ग हे एक वरदानच वाटावे.

या व्यतिरिक्त मुंबईहून साप्ताहिक 'शोधन' हे गेली सुमारे १६ वर्षे नियमितपणे प्रकाशित होत आहे. डॉ. एम. ओ. शेख हे या साप्ताहिकाचे कार्यकारी संपादक आहेत इस्लाम धर्म आणि मुस्लिम समाजाबाबत बहुसंख्याक समाजात पध्दतशीरपणे निर्माण करण्यात आलेले गैर-समज दूर करुन हिंदू-मुस्लिम समाजात परस्पर विश्वास निर्माण करणे हे या वृत्तपत्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रात कुणाच्या तरी वरदहस्ताने ज्यावेळी हमीद दलवाई ने सत्यशोधक नांवाचे मंडळ स्थापन करुन स्वतःच इस्लाम धर्म व मुस्लिम समाजाबाबत बहुसंख्याक समाजात गैरसमज पसरविण्याचे कार्य सुरु केले त्या काळात साप्ताहिक शोधनने या मंडळाच्या समाजहितविरोधी कार्याला आळा घालण्याचे कामी फार महत्वाची भूमिका बजाविली आहे मुस्लिम समाजाचे प्रबोधन करण्याचे कामी शोधन नेहमी प्रयत्नशील असते.

'आकाशगंगा' हे साप्ताहिक गेली सुमारे ६ वर्षें रत्नागिरी व कोल्हापूर येथून नियमितपणे प्रकाशित होत आहे. मुस्लिम अल्पसंख्यांक व मागासवर्गीय समाजावरील अन्यायाला वाचा फोडणे, मुस्लिम समाविषयी गैरसमज

पसरविणाऱ्या प्रवृत्तींना वाचकांसमोर उघड करणे ही या साप्ताहिकाची उद्दिष्टये आहेत त्याचप्रमाणे सर्वधर्म समभाव आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याचे दृष्टिने इष्ट ते लिखाण वा साहित्य 'आकाशगंगा' मध्ये प्राधान्यतेमे प्रकाशित केले जाते.

वरील तीन प्रमुख वृत्तपत्रांव्यतिरिक्त साप्ताहिक "दर्शक" अहमदनगर; सा. 'शबाब' पा. 'ऐश्वर्य' ; दै. 'बंधुप्रेम' ; पा. 'विश्रामश्री' सा. 'शहीद सुल्तान' सोलापूर; सा. 'आमंत्रण' बेळगांव. इत्यादि मराठी साप्ताहिके व पाक्षिके मुस्लिम प्रकाशकां कडून चालविण्यात येत आहेत.

राज्यातील मुस्लिम अल्पसंख्याक समाज हा आर्थिक दृष्टया बहुतांश मागासलेला आहे. वृत्तपत्राचा स्वतःचा प्रेस चालविण्यासाठी मोठी गुंतवणूक करून यशस्वीरित्या वृत्तपत्र चालविणें मुस्लिम प्रकाशकांना साहजिकच कठिण आहे सर्वार्थाने आर्थिक अडचणींना तोंड देऊन ही वृत्तपत्रे चालविली जात आहेत असे या वृत्तपत्रांचा आर्थिक ताळेबंदाचा अभ्यास केला असता दिसुन येईल.

तरीही मराठी जाणणाऱ्या मुस्लिम बांधवांचे प्रबोधन करणे, मुस्लिमेतर बांधवांपर्यंत एकात्मतेचा संदेश पोहोचविण्यासाठी यापेक्षा मोठया प्रयत्नांची व अधिक मराठी वृत्तपत्रांची समाजाला गरज आहे याची जाणीव मुस्लिम समाजाला आता होत आहे ही निश्चितच एक दिलासा देणारी बाब मानता येईल.

कल्पना.

कल्पना मी करत होतो.
कांहीतरी लिहित होतो.
कल्पनेत शोध मी करत होतो,
कुठेतरी मी 'ती' शोधत होतो.
कल्पनेत स्वप्नी मी पहात होतो,
केव्हा पासून त्यातच गुंग होतो.
कल्पनेत रंग मी भरत होतो,
कसेतरी रंग मिसळत होतो.
कल्पनेतच मी वावरत होतो,
का? पण वास्तवात वेडा ठरत होतो.

तांबोळी एच. बी.

कमला संदेश.

वेळेवर नैऋत्ये आले मौसमी वारे।
पण महागाईने त्रस्त आहे जन सारे।
कोठे डाळ शीजते कळतच नाही।
स्विज़ बँक पान नंबर मिळतच नाही।
कृषा वरुनाची शेतकरी समाधानी।
कधी कमी होईल भ्रष्टाचार बेईमानी।
कधी थांबेल 'हयांची' वर कमाई।
नीतीमत्तेस धन नाग डसतच जाई।
मरण विसरले पाप पुण्य विसरले।
फिल्मी नटनटचां, घरीदारी मिसळले।
महीषासूर मर्दीनीचा अवतार झाला।
पाप मुक्त करण्या कमलासंदेश आला।

दस्तगीर राज ▣ करमाळा

'तांबडं फुटलं' अमर शेख यांच्यावर तिसरा ग्रंथ.

विलास म्हात्रे.

पेण – रायगड जिल्हयातील प्रसिध्द साहित्यिक व मराठी साहित्यात समीक्षक म्हणून विशेष मान्यता पावलेल्या प्रा. डॉ. माधव पोतदार यांचा महाराष्ट्र शाहीर अमर शेख यांच्यावरील तिसरा अभ्यासपूर्ण ग्रंथ 'तांबडं फुटलं' या नावानं प्रसिध्द होत आहे पुस्वक छपाई पूर्ण होऊन ग्रंथाचे प्रकाशन अलिबाग येथे केले जात आहे.

डॉ. माधव पोतदार यांनी अमर शेखांची कविता (१९६५) अमर शेख व्यक्ति आणि वाङमय (१९७५) हे दोन प्रबंध लिहुन प्रकाशित करुन साहित्य क्षेत्रात विशेष मान्यता मिळविलेली आहे. मुंबई विद्यापीठाचे पी.एच. डी. चे गाईड असलेले डॉ.माधव पोतदार यांचा अमर शेख याच विषयावरील हा तिसरा 'ताबंड फुटलं' हा ग्रंथ पूर्वींप्रमाणेंच विद्वन्मान्य होणार आहे.

'ताबंड फुटलं' या ग्रंथाला मराठी वाङमय इतिहासाचे गाढे अभ्यासक प्रा ह. श्री. शेणोलीकर यांची प्रस्तावना लाभली असून त्यांनी म्हटले आहे की, 'कवीसंबंधी कांही तुलनात्मक विचार फुटकळ स्वरुपात मराठी समीक्षेमध्ये आले आहेत परंतू केवळ तौलनिक टीकेच्या स्वरूपाचा समीक्षा ग्रंथ आज तरी मराठीत दुर्मिळ आहे केशवसूत-अमर शेख अशी अशी तुलना करुन डॉ. माधव पोतदार यांनी ही उणीव भरून काढलेली आहे अमर शेख हा केवळ शाहीर आहे तो 'मुस्लिम आहे कम्युनिस्ट आहे इ. कारणांनी मान्यवरांनी त्यांच्या कवितेकडे दुर्लक्ष केले प्रा पोतदार यांनी आपल्या टीका पुस्तकातून त्यांच्या कवितेची महत्व पटवून देण्याचा कसोशीने प्रयत्न केला याबद्दल खरोखरच ते धन्यवादास पात्र आहेत टीका पुस्तकातील निष्कर्षाशी अमर शेखांच्या कवितेत केवळ चाहतेच नव्हले तर सारेच मराठी रसिक सहमत होतील यात बिलकुल शका नांही डॉ. ह. वि. तोडमल यांचाही या ग्रंथाला अभिप्राय लाभला असून त्यांनी डॉ. माधव पोतदार हे अमर शेखांचे समर्थ भाष्यकार असल्याचे म्हटले आहे.

डॉ. माधव पोतदार यांनी आपले अनेक व्याप सांभाळून 'ताबडं फुटलं' हा टीका ग्रंथ पूर्ण केला याबद्दल मान्यबरांकडून त्यांचे खास कौतुक केले जात आहे.

मराठी नाटकातील मुस्लिम लेखकांचे योगदान.

—म. इस्हाक अकबरसो. मनियार सोलापूर

आज सोलापूरात भरणाऱ्या मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमिवर मुस्लिम लेखकांचे मराठी नाटकातील योगदान किती व कोणत्या प्रकारचे आहे, या संबंधात विचार करीत असता निराशाच पदरी पडते १४ व्या शतकापासून मुस्लिमांनी मराठी साहित्यात अनेक अंगानी भर घातलेली दिसून येते अगदी अभंगा पासून शाहिरी वाङ्मया पर्यन्त मग नाटका कडेच दुर्लक्ष कां? धार्मिक मर्यादा हे तर कारण नसेल! पण तसे नसावे कारण शेख महंमदां सारख्या मुस्लिम कवीने श्रीकृष्णा वर किती तरी रचना केलेल्याचे आढळतात ज्या प्रमाणें कोल्हापूरचे शाहु महाराज आणि बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांनी मराठी रंगभूमीला राजाश्रय दिल्याने मराठी रंगभूमी समृध्द झाली त्या प्रमाणें मुस्लिम नट—नाटककार व कंपन्याना लाभला नांही त्यामुळेही कदाचित मुस्लिम साहित्यकांनी नाटय लेखना कडे पाठ फिरविलेलीं असावी अशाही घोर अंध:कारात आशेच्या मिणमिणात्या प्रकाशात कांही मुस्लिम लेखकांच्या नाटय कलाकृती आपल्या कर्तृत्वाची साक्ष देत असल्याचे पाहुन मनाला एक प्रकारचे समाधान लाभते.

मुस्लिम नाटककारांचा शोध घेताना अवधच्या नवाबा पासून सुरुवात करावी लागेल अवधचा नवाब वाजिदअली शाहा ने आपल्या रंगमहालात कृष्णा-राधा अन गोपींचे रास सादर करताना कृष्णलिलेस नाटयभिनयाने सादर केल्याची अनेक उदा. आहेत.

त्यानंतर शाहीरी परंपरेंत नावाप्रमाणेंच अमर झालेले अमर शेख यांचा विचार करावा लागेल त्यानी अनेक लोक नाटचे लिहली असून 'पहिला बळी' या नावाचे नाटक ही लिहले आहे महमद नैसर्गी यांचे 'जीवन संपले जगण्या आधी' डॉ. आय. बी. मिन्ने यांची 'आय वॉन्ट स्मॅश' ही गर्दच्या दुष्परिणामाचे यथार्थ चित्रण असलेली एकांकिका एवढेच तुटपुंजे साहित्य प्रकाशित झालेले आढळते

अप्रकाशित साहित्याचा शोध घेतानां सोलापूर शहरातील लेखकांची कामगिरी डोळयात भरण्या सारखी आहे अ. गनी मुजावर या कामगार कलावंताने गिरणी कामगारांच्या जीवनावर आधारित 'त्याग' हे नाटक आढळते १९६४ साली लेडिज क्लबच्या रंगमंचावर कामगार केंद्र नाटय स्पर्धेत हे नाटक सादर झालेले होते 'लपंडाव' हे नाटक त्यांचाच मुलगा शहानवाझ याने लिहिल्याचे आढळते या नंतर विचार करावयाचा तर एकेकाळी शहर वासियांना आपल्या लोकनाटयाने झपाटून टाकलेल्या कवी अ. अजीज नदाफ यांचा नाटकांचा करावा लागेल. अनेक हस्तलिखितें त्यांनी एका मागोमाग स्टेजवर आणली त्या मध्ये

'कांटेरी फुल' 'येथे सारे स्वस्त आहे' 'अडीच अक्षरे प्रेमाची', 'व्यथा ही हृदयाची' या नाटकांचा समावेश करावा लागेल 'येथे सारे स्वस्त आहे' या नाटकाला कामगार नाटय स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले होते कौटुंबिक समस्यांची उकल हळूवार पणें केल्यांचे या त्यांच्या नाटकातून दिसले नाटकापेक्षाही नदाफांची लेखणी लोकनाटयात मुक्तपणें विहार करते त्यांच्या लोकनाटयाने त्याकाळी गणपती उत्सवातून धमाल उडवून दिली होती 'भानगड नगराची मोहिनी, आमदार बिनबुडाचे गाडगे, अन्धेर नगरी, श्रीमान फुकटे, माकडाच्या हाती कोळीत, दळूबाई दळ, सैन्य चालले पुढे, मावशीचे लग्न, 'तीन घनचक्कर' ही त्यांची लोकनाटये शाहीर फाटे आणि पार्टी मधून साऱ्या महाराष्ट्र तून गाजलेली आहेत विशेषत: भानगड नगराची मोहिनी, आ. बिनबुडाचे गाडगे, श्रीमान फुकटराव फुकटे आणि तीन घन चक्कर या लोकनाटयांनी सोलापूरकर वेडे झालेले मी स्वत: पाहिले आहे हलक्या फुलक्या विनोदातून प्रेक्षकांना गुदगुल्या करीत समाजातील दोष दाखविणें, सरकारी धोरणांची खिल्ली उडविणे, पुढाऱ्यांच्या, सरकारी अधिकाऱ्यांच्या आणि पोलीसांच्या खाबूरगिरीवर हसत हसत बोट ठवणें ही त्यांच्या लेखणीचे वैशिष्ठये म्हणता येईल संपूर्ण लोकनाटयभर प्रेक्षक सतत हसतच असायचे त्यांच्या रूपाने सोलापूर करांना एका चांगल्या नाटकाची ओळख झाली ते येथील पानगल प्रशालेतील ज्युनि. कॉलेजला प्राध्यापक आहेत त्यांचा पेशा जरी शिक्षकी असला तरी त्यांची वृती ही कवीची आहे अनेक सरस लोकनाटये लिहिणाऱ्या सरांनी नंतरच्या काळात कोणत्याही नव्या कलाकृतीची भर घातली नाही याचे मोठे आश्चर्य वाटते.

संगमेश्वर कॉलेजच्या साहित्य खाणीतून अनेक साहित्यिक सोलापूरकरांना दिले त्या मध्ये बाबूलाल करजगीकर यांचा उल्लेख करावा लागेल. एखादा उत्तम गवयी ज्या प्रमाणे तिन्ही सप्तकातून लिलया गावू शकतो त्याप्रमाणे ते हिंदी-उर्दू व मराठी या तिन्ही भाषेत आपल्या लेखणीची करामत करतात गेल्या कित्येक वर्षापासून त्यांचीं लेखणी अव्याहत कार्यरत आहे बाई जात्यावर दळायाला बसली म्हणजे जशा तिला ओव्या सुचतात त्या प्रमाणें उर्दू एकांकिका स्पर्धा आपल्या किंवा स्नेहसंमेलनाचे दिवस आले तर त्याना विषय सुचून नव्या नाटकाचा जन्म होतो विकृतीं दाखविण्यापेक्षा संस्कृती दाखविणया कडे आणि उपदेशापेक्षा रंजन करण्या कडे त्यांच्या लेखणीचा ओढा आहे शब्दांचा हातरखंडा आहे सामान्य प्रेक्षकांची नाडी अचूक हेरून समाजातील व्यंगावर विनोदांची फुंकर घालून व्यंग अधिक उघडे करून प्रेक्षांची मनमुराद करमणूक करणें हा त्याच्या लेखणीचा खास शौक म्हतता येईल त्यांच्या एकंदर नाटय-निर्मितीचा आढावा घेतला तर त्यांच्या नाबावर निदान शंभर एक एकांकिका व नाटके जमा झालेली दिसतील

सोलापूरचे प्रसिध्द कवि म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल अशा मुबारक शेख यांनी 'एका कळीचे निर्माल्य' ही मराठी एकांकिका लिहली आहे.

परंतू दुर्देव असे की बरील सर्व नाटके ही अप्रकाशित आहेत अजूनही यांना प्रकाशात आणणारा गॉड-फादर लाभलेला नाही मनात दाटून आलेल्या उत्कट आणि उतफूर्त विचारांना शब्द बध्द करुन त्यांनी आपल्या कुवती प्रमाणे रंगभूमीवर दृश्य रुप देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

उर्दू राष्ट्रीय कविता
एक दृष्टिक्षेप

प्रा. मीर इस्हाक शेख, सोलापूर.

भारताच्या स्वातंत्र्य लढयात उर्दू राष्टीय कविते ने महत्वपूर्ण योगदान केले आहे स्वातंत्र्याचे स्वप्न साकार करण्याचे श्रेय ज्या प्रमाणें राजकीय व सामाजिक चळवळींना आहे त्याच प्रमाणें उर्दू काव्यालाही आहे १८५७ च्या स्वातंत्र्य समरापासून राष्ट्राच्या पारतंत्र्या विषयीची चीड व दुरवस्थेविषयी दुःखाची भावना भारतीय जनतेत बळावली व ती अत्यंत प्रभावीपणें उर्दू काव्यात प्रतिबिंबित होऊ लागली.

थोर मुस्लिम समाजसुधारक सर सय्यद अहमद यांच्या अलीगढ जळवळीमुळे उर्दू साहित्याला नवीन दिशा मिळाली नवजागृतींच्या आधुनिक उर्दू काव्याचे प्रणेते मौलाना मुहम्मद हुसेन 'आजाद' (१८३० - १८९०) आणि मौलना अल्ताफ हुसेनहाली (१८३७-१९१४) यांनी पाया घातला केवळ पूर्वजांच्या महान काव्याचे अनुकरण करता कवींना नवींन सामाजिक समस्यांकडे लक्ष दिले पाहिजे वास्तवाचे भान ठेवून जीवनचित्रण केले पाहिजे असे आवाहन 'आजाद' यांनी केले ८ मे १८७४ रोजी लाहोर येथे झालेल्या सुप्रसिध्द मुशायऱ्या मध्ये अनेक कवींनी नवीन वातावरणाच्या व नवीन पध्दतीच्या रचना सादर करून उर्दू काव्याला नवीन वळण दिले 'आजाद' यांची 'हुब्बे वतन' ही देशभक्तीच्या भावनांचा अविष्कार करणारी अत्यंत महत्वपूर्ण कविता आहे ते म्हणतात --

ऐ आफताबे हुब्बे वतन तू किधर है आज
तू किधर है के कुछ नही आता नजर है आज
तुझ बिन जहां है आंखों मे अंधेरा ही रहा है
तुझ बिन सब अहले दर्द है दिल मुर्दा हो रहे
और दिल के शौक सीनों मे अफसुर्दा हो रहे
ठंडे हैं क्यों दिलों मे तेरे जोश हो गये
क्यों सब तेरे चिराग हैं खामोश हो गये
हुब्बें वतन की जिन्स का है कहेतसाल क्यों
हैंरां हूं आजकल पडा इस का अकाल क्यों

मौलाना अल्ताफ हुसेन 'हाली' यांनी १८५७ च्या बंडानंतरच्या देशाच्या स्थिती-विषयी मोठे दुःख प्रकट केले आहे देशबांधवांना देशासाठी झटण्याचे आवाहन करताना ते म्हणतात --

बैठे बेफिक्र क्या हो हमवतनो
उठो अहले वतन के दोस्त बनो
तुम अगर चाहते हो मुल्क की खैर
न किसी हमवतन को समझो गैर
हो मुसलमान इस में या हिंदू
बुध मजहब हो या के हो ब्राहमो

सब को मीठी निगाह से देखो
समझो आंखों की पुतलीयां सब को

मातृभूमीची मूठभर माती स्वर्गाहून श्रेष्ठ आहे, असे सांगतात--

तेरी एक मुश्ते ख़ाक के बदले
न लू हरगीज अगर बहिश्ते मिले
जान जब तक न हो बदन से जुदा
कोई दुश्मन न हो वतन से जुदा.

'आजाद' आणि 'हाली' यांच्या काव्याचा प्रभाव अनेक कवीवर पडला मौलवी महंमद इस्माईल मेरठी यांनी स्वातंत्र्यातील कोरडी भाकर पारतंत्र्यातील मिष्ठान्नापेक्षा श्रेयस्कर आहे, असे प्रतिपादन केले आहे.

मिले खुष्क रोटी जो आजाद रह कर
तो वो खौफ व जिल्लत के हलवे से बेहतर
जो टूटी हुवी झोपडी बेजरर हो
भली उस महल से जहां कुछ खतर हो

अकबर इलाहाबादी हे उर्दूचे सुप्रसिध्द हास्य-कवी, त्यांनी राजकीय आणि सामाजिक आशयाच्याही पुष्कळ कविता लिहिल्या आहेत महात्मा गांधीविषयी त्यांनी आपल्या 'गांधी-नामा' या काव्यात आदर व्यक्त केला आहे.

नहीं हरगीज मुनासीब पेशबीनी दौरे
– गांधी मे
जो चलता है वो आंखे बंद कर लेता
– है आंधी मे

महात्मा गांधी मुळेच पौर्वात्य संस्कृतीच्या झंझावतातातून वाचली, असे अकबर म्हणतात ---

बुझी जाती थी शम्मए मशरीकी
–मगरीब की आंधी से
उम्मीदे रोशनी कायम है लेकिन
–भाई गांधी से

महात्मा गांधीजींचा ते जयजयकार करतात --

शेखजी तुमको मुबारक रोम व रए
हम तो कहते हैं गांधीजी की जय

स्वदेशीच्या जळवळीचे ही त्यांनी स्वागत केले होते--

तहरीके स्वदेशी में मुझे वज्द है अकबर
क्या खूब से नग्मा छोडा है देश की धुन मे

दुर्गासहाय 'सुरूर' जहानाबादी, पंडित ब्रिजनारायण 'चकबस्त' आणि डॉ. इक्बाल यांनी उर्दूतील राष्ट्रीय काव्याचा गौरवशाली परंपरेत महत्त्वाची भर घातली 'सुरूर' यांच्या 'जामे-सुरूर' व 'खमखानाए सुरूर' या काव्यसंग्रहात त्यांच्या उत्कट देशभक्ती चे दर्शन घडते. पं. ब्रिज नारायण 'चकबस्त' यांच्या 'सुबहे-वतन' या काव्यसंग्रहात देशप्रेमाने ओतपोत असलेल्हा व हिंदू मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार करणाऱ्या कविता आढळतात--

उत्तुंग प्रतिभेचे तत्वज्ञ कवी डॉ. मुहम्मद इक्बाल यांच्या 'बांगे-दरा' या काव्यसंग्रहात त्यांच्या प्रखर राष्ट्रभक्तीच्या कविता समाविष्ट आहेत भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात त्यांनी लिहिलेल्या–

सारे जहां से अच्छा हिंदोस्तां हमारा
हम बुलबुले हैं इसकी यह गुलसितां हमारा

या कवितेला विपुल लोकप्रियता लाभली आहे देशप्रेम, राष्ट्रवाद आणि समाजकल्याण

हे विषय प्रामुख्याने त्यांच्या प्रारंभीच्या रचनात आढळतात मजूर, शेतकरीं या श्रमजीवी वर्गांचे प्रश्न ही त्यांनी आपल्या कवितेत आवेशाने मांडले. हिंदु-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार करुन त्यांनी प्रभू रामचंद्र, गुरुनानक, स्वामी रामतीर्थ या थोर भारतीय विभूतीवर कविता लिहिल्या जुन्या मंदिरा ऐवजी आणि देवता ऐवजी मातृभूमी हेच दैवत मानले पाहिजे, असे ते सांगतात–

सच कह दूं ऐ ब्रेहेमिन गर तू बूरा न माने
तेरे सनम कदों के बूत हो गये पूरानें
पत्थर की मूर्ती मे समझा है तू खुदा है
खाके वतन का मुझको हर जर्रा देवता है

हिमाला, नया शिवाला, तरानए हिंदी, तस्वीरे दर्द इ. त्यांच्या राष्ट्रभक्ती कविता प्रसिध्द आहेत १९३८ साली या थोर कवीचा मृत्यू झाला तेव्हा 'भारतीय लढयातील अत्यंत सुंदर आणि तेजःपुंज तारा अस्तगस्त झाला असे उद्‌गार पंडित जवाहरलाल नेहरु यांनी काढले.

मोलाना जफर अली खान यांनी 'हिंदुस्तान' 'इन्कलाब-ए-हिंद!' 'आजादी का बिगुल' या मातृभूमीवरील प्रेम व्यक्त करणाऱ्या करिता लिहिल्या, भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील थोर कवी 'हसरत मोहानी' हे संपूर्ण स्वराज्याचे पुरस्कर्ते होते त्यांच्या समग्र कवीतांचा 'कुल्लियाते हसरत' हा संग्रह प्रसिध्द झाला आहे लो. टिळकांविषयी त्यांना अत्यंत प्रेम होते. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या कवितेत त्यांनी शोकाकुल अंतकरणाने टिळकांना श्रध्दांजली वाहिली आहे–

मातम न हो क्यों भारत मे बर्पा दुनिया से
– से सिधारें आज तिलक
बलवंत तिलक, महाराज तिलक, आजादी
– के सरताज तिलक

'नजाते हिंद' ही त्यांची कविता देशभक्ती चे दर्शन घडविते.

महंमद अली जोहर, जाफर अली खान, जोश मलीहाबादी, सफी लखनवी, फिराक-गौरखपूरी, हाफीज जालंधरी, सीमाब अकबराबादी, अख्तर शिरानी, फैज अहमद फैज, अली सरदार जाफरी, अख्तरुल इमान, सिकंदर अली वज्द, मखदूम मोहियोद्दीन, सागर निजामी साहिर लुधियानवी, जांनिसार अख्तर, अली ज्वाद जैदी अशी राष्ट्रीय कविता लिहिणाऱ्या उर्दू कवींचीं फार मोठी परपरा आहे. १८५७ च्या आसपास सुरु झालेल्या या उर्दू राष्ट्रीय कवितेच्या परंपरेला आज जवळ जवळ दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत अगदी १५८० ते १६११ या कालखंडात होऊन गेलेल्या आणि पुस्तकरुपाने ज्याचे काव्य सर्वंप्रथम संकलित होऊन प्रसिध्द झाले त्या मुहम्मद कुली, कुतुबशहाच्या कवितेत ही हिंदी भाषेचा हिंदू शूर वीरांचा आणि पौराणिक कथांचा गौरवाने उल्लेख केलेला आढळतो भारतीय स्वातंम्याच्या आंदोलनात महत्त्वाची कामगिरी बजाविणाऱ्या आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवाज बुलंद करणाऱ्या उर्दू राष्ट्रीय कवितेचे भारतीय समाजावर मोठेच ऋण आहे आणि केवळ ऋणनिर्देश म्हणूनच काव्याच्या एका दृटिक्षेपात धावता आढावा घेण्याचा प्रयत्ने या लेखात केला आहे.

□□□

पहिल्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनात संमत करण्यात आलेले ठराव

१) पहिल्या अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलनातील सर्व प्रतिनिधी असा ठराव करीत आहेत की, महाराष्ट्रातील मराठी मुस्लिम लेखकांना राज्य पातळीवर एकत्र आणणारे व्यासपीठ निर्माण करण्यासाठी मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना करावी तसेच दरवर्षी भरणाऱ्या मराठी साहित्य संमेलनात दलित साहित्याप्रमाणेंच 'मुस्लिम साहित्य' या विषयाला प्रतिनिधीत्व दिले जावे.

२) महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाने आमच्या मुस्लिम मराठी साहित्य परिषदेला भरघोस अनुदान देऊन मुस्लिम मराठी साहित्य संशोधनाला व प्रकाशनाला प्रोत्साहन द्यावे.

३) मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विशेषतः ग्रामीण विभागात महाराष्ट्र शासनाने मुस्लिम समाजात साक्षरता प्रसाराची मोहीम हातात घ्यावी.

४) मराठी पाठयपुस्तकात प्राचीन व आधुनिक मुस्लिम साहित्यकांचे साहित्य समाविष्ठ करावे त्याबाबतीत पाठयपुस्तक समितीने मुस्लिम मराठी साहित्य परिषदेचा सल्ला घ्यावा.

५) देशातील फुटीर आणि जातीयवादी शक्ती वाढत आहेत त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे त्या बद्दल हे संमेलन चिंता व्यक्त करीत आहेत व मुस्लिम मराठी साहित्यकांनी राष्ट्रीय एकात्मतेला प्राधान्य देवून जनजागृती करावी

६) उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळामधून ३ री पासून मराठी विषय शिकविण्यात येतो परंतू त्यासाठी मराठी विषयाचे शिक्षक नसतात तरी त्यासाठी मराठीचा विशेष शिक्षक, चित्रकला, क्रीडाशिक्षका प्रमाणेंच नेमावा अशी मागणी हे संमेलन करीत आहे.

अंधश्रद्धा आता मनातून काढा.

" मुलगा म्हणजे वंशाचा दिवा "
हो अंधश्रद्धा आता मनातून काढा.
मुलगी हे सुद्धा अपत्यच आहे.
मुलीलाच प्रेम लावून मुलासारखं वाढवा.
मुली प्रत्येक क्षेत्रात आता
मुलांइतक्याच आघाडीवर आहेत.
मुलगी होणं म्हणजे शाप नव्हे.
आपल्या मुलीचे व्यक्तिमत्व
संपन्न करण्यासाठी शासनाच्या
कल्याणकारी तसेच शैक्षणिक व
आरोग्यविषयक कार्यक्रमांचा लाभ घ्या
मुलीला मुलाइतकीच समान संधी द्या.

डीजीआयपीआर.

मुस्लिम मराठी साहित्यिक - नांवे व पत्ते.

१) अन्वर हवालदार
१३, कामाठीपूरा, चाळ नं. ५ रुम नं. १५/१
स्टेबल स्ट्रीट मुंबई-४००००८

२) हुसेन फरीद शेख (माळी)
पंढरपूर पाणी पुरवठा केंद्र पन्ढरपूर-४१३३०४

३) अजीज हसन मुकरी
मु.पो. जैतापूर ता राजापूर जि. रत्नागिरी

४) रफीक अहमद शेख
घ. नं. ३३९९. पांढरीचा डोला
पन्ढरपूर-४१३३०४

५) प्रा. अफजल अन्सारी
द्वारा- सीताराम दामोधर पारीक
१०६, कपडा बाजार, मालेगांव-४२३२०३

६) रईस एम. पटेल
अक्कलकोट स्टेशन-४१३२२७

७) अनीस चिश्ती
४२५, केदारी रोड, पुणें-४११००१

८) पठाण हमीदखान
डॉ. जाकीर हुसेन हायस्कुल,
सेलू-४२१५०३ जि. परभणी.

९) डॉ परकार
'हमीदा शरीफ व्हिला' मु.पो. फुरूस
ता. खेड जि. रत्नागिरी

१०) महमद अल्लाबक्ष शेख
मु. पो. ता. मंगळवेढा जि. सोलापूर

११) रफीक सूरज मुल्लां
महागांव ता. गडहिंगलज जि. कोल्हापूर

१२) युनूस अ. र. तांबोळी
स्टेशन रोड, मु.पो मोडनिंब ता माढा
जि. सोलापूर

१३) महंमद शफी अन्सारी
मुजाहिदे मिल्लत नगर, बोन फॅक्टरी
वडजाई रोड, धुळे-४२४००१

१४) शेख अ. वाहिद
रूम नं, १६२ बॉईज हॉस्टेल नं. १
गव्हर्मेन्ट मेडिकल कॉलेज
मिरज-४१६४१० जि. सांगली

१५) अझीम नवाझ राही
मु. पो. साखर-खेडी ता. सिंधखेड-राजा
जि. बुलढाणा- ४४३२०२

१६) म. इब्राहीम नाईकवाडे
(लावणीकार) मु. पो. रेंदाळा
ता. हातकणगले जि. कोल्हापूर

१७) मुश्ताक मोमीन
२९८/१९, मुरीज मॅन्शन, शास्त्री मार्ग
कुर्ला बंबई-४०००७०

१८) प्रा शफी याकुब साहेब
भुई गल्ली मु. पो. परभणी

१९) डॉ नसीमा पठाण
१४२, ब गुलमर्ग, आसरा हौसिंग सोसायटी
होटगी रोड, सोलापूर-३

२०) आसिफ फेरोजाबादी
बी-१२/१५, डी. ए. टी. क्वाटर्स, लुल्ला नगर
जवळ, वानवाडी रेंज पुणे-४११०४०

२१) रब्बे सलाम शेख
बुधवार पेठ मोहोळ. जि. सोलापूर

२२) डॉ. डी. ए. शेख
गणपती पेठ, सांगली-४१६४१६

२३) शहाजहान तांबोळी
मु पो. कुरुल ता. मोहोळ जि. सोलापूर

२४) प्रा. नसीम मन्नान बिजापूरे
३३५, साखर पेठ सोलापूर-५

२५) सय्यद मेअराज
द्वारा- सय्यद अन्जूम अली,
घर. नं. २१४, बॉक्स नं. १४ लेबर कॉलनी,
नांदेड-४३१६०१

२६) सलीम शेख
१६७६, थळोबा पेठ, निपाणी-५९१२३७
जि. बेळगांव

२७) शर्फ मुकादम
पंचनदी, ता. दापोली जि. रत्नागिरी

२८) बशीर जमादार
मु. पो. कुन्नूर(व्हाया निपाणी)
ता. चिक्कोडी जि. बेळगांव

२९) दस्तगीर राज
बत्तूल मंझील फंड गल्ली, करमाळा
जि. सोलापूर

३०) हुसेन जमादार
सम्राट कॉलनी विक्रम नगर, कोल्हापूर

३१) मिर्झा अटकली बिलोलीकर
केंद्रीय शाळा, गनीमपूरा नांदेड

३२) प्रा. आर. एस बडगुजर
संपादक-बडगुजर उवाच
८० नवी पेठ जळगांव

३३) सौ. मुमताज देशपांडे
कला-वाणिज्य-महाविद्यालय
अंबड जि. जालना

३४) मिर्झा अ. रजाक
धनज(माणिकवाडा) ता. नेट जि. यवतमाळ

३५) कलीम मोकासे
ई जी पॅक प्रा. लि. प्लॉट नं. ७८०/२
जी.आय.डि.सी, वापी(गुजराथ)-३९६१९५

३६) उस्मान शेख
(सब. इंजि. एम. एस. ई बी)
उपकेंद्र-येडशी-४१३४०५ जि. उस्मानाबाद

३७) डॉ. प्रा मोहम्मद इस्हाक
मानवत कॉलेंज, मानवत जि. परभणीं

३८) प्रा. शफी शेख
मराठी विभाग, मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

३९) आसिफ म. पठाण
१२३ तिलक पथ लासलगांव-४२२३०६
जि. औरंगाबाद

४०) प्रा. एन जी एम काझी
वरचे गांव आंबेडकर मार्ग
श्रीपूर-४२५४०५ जि. धुळे

४१) लियाकत पठाण
प्रिन्स इलेक्ट्रॉनिक सेंटर
मेन रोड जामखेड-४१३२०१ जि. अ'नगर

४२) ॲड. जे. डी. बडेघरवाले
१७८ पी. बी हलगे जि. बेळगांव

४३) एम ए नाईक
२४१७ नेहरू चौक निपाणी जि. बेळगांव

४४) इ र मुल्ला (गुरूजी)
मु. पो. हन्नूर ता. अक्कलकोट जि. सोलापूर

४५) इब्राहीम अफगान
उप-संपादक दैनिक गोमांतक
१२९, सन्वोरकोट्टा कून कोलीम--गोवा

४६) एम सी शेख संपाद विश्राम श्री
४६६, न्यू पाच्छा पेठ सोलापूर

४७) सलीम काझी
अरविंद गंडभीर हायस्कुल
जोगेश्वरी (पूर्व) मुंबई-४०००६०

४७) प्रा. एम ए शेख
अक्कलकोट कॉलेज, अक्कलकोट जि सोलापूर

४९) एम आर बेग
प्रिंसीपॉल क्षिरसागर कॉलेज बीड-४३११२२

५०) एस जे रहमान बाबू साहेब
मु नसीबपूरा, पो समस्तपूरा
अचलपूरसिटी, जि. अमरावती

५१) कु. एस एम शेख
द्वारा- एम एम शेख (बी डी ओ)
पंचायत समिती फलटण जि सातारा

५२) बशीर अहमद बागबान
१०६ रविवार पेठ सातारा

५३) डॉ बालेखान साहब
व सौ. फातेमा मुजावर
मॉडेल को-ऑप हौ. सोसायटी, परदेशी आळी
पनवेल -- ४१९२९८ जि रायगड

५४) डॉ युनूस अगास्कर
बी-१३८ डायव्हयू सहकार नगर
अन्धेरी (पश्चिम) मुंबई-५८

५५) जनाब खालिद अगास्कर
कोकण मर्मन्टाईल को-ऑप बॅन्क लि.
हार्बर क्रिस्ट, माझगांव मुंबई-१०

५६) डॉ अ सत्तार दळवी
उर्दू विभाग प्रमुख मुंबई विद्यापीठ मुंबई-९८

५७) मुहम्मद असदुल्ला
एव्हरेस्ट हार्डवेअर. मु पो- वरुड ४४४९०६
जि अमरावती

५८) श्रीराम वासुदेव पन्डित (अनुवादक
बिल्डिंग नं १४/४५९ चौथा मजला
कुर्ला (पुर्व) मुंबई-२४

५९) पं गुलाम दस्तगीर बिराजदार
संस्कृत कुटी, वरळी मुंबई-१८

६०) प्रा बी ए कुरनूर
शाहीन मंझील स्टेशन राड अक्कलकोट
जि सोलापूर

६१) शब्बीर काझी
गोंधळी गल्ली शुक्रवार पेठ कोल्हापूर

६२) सौ आयशा अपराध (एम एल)
के एम सा कॉलेज कोल्हापूर

६३) प्रा तस्नीम पटेल
पानसरे महाविद्यालय
अर्जापूर ता बिलोली जि नादेड

६४) प्रा फरिदा पटेल
प्रतिष्ठान महाविद्यालय
मु पो पैठण जि औरंगाबाद

६५) शाहीर शरीफ कोकळगावकर
मु पो कोकळगाव ता निलंगा जि. लातूर

६६) जी बी मुल्ला
मु.पो. म्हैसाळ ता मिरज जि सांगली

६७) जी ए पटेल (गझल गायक)
द्वारा- डॉ शरीफुद्दीन टिचर, अन्जुमन्स
न्यू क्वार्टर्स मंगल बाजार, सदर
नागपूर-- ४४०००१

६८) पटेल सईद जावेद
९ अ मास्टर कॉलनी मेहरूण जि जळगांव

६९) कॉ हबीब भाई
चौक, पोलीस स्टेशनाच्या मागे औरंगाबाद

७०) प्रा वि अ शेख
फलटण जि सातारा-४१५५२३

७१) प्रा अमीन मोदी
शुक्रवार पेठ बारसकर गल्ली
फलटण जि सातारा-४१५५२३

७२) अँड. दस्तगीर भाई के मेटकरी
६२५ रविवार पेठ फलटण जि सातारा

७३) श्री वि एस किरनळी
संपादक शब्द-शिल्प पनवेल जि. रायगड

७४) एम ए शेख
मॉडेल कॉलनी परदेशी आळी
पनवेल जि, रायगड

७५) प्रा इब्राहीम फैज
वाडिया कॉलेज पुणें-१

७६) सिराज मुजावर
मु. पो. कळे ता पन्हाळा जि कोल्हापूर

७७) निसार सिलोमी
मु पो उरण जि रायगड

७८) शफी नवरंगे
मु पो उरण जि रायगड

७९) जावेद नदीम (नझराना बेकरी)
कापड गल्ली पनवेल जि रायगड

८०) शब्बीर सिलोमी
याकुब बेग हायस्कुल पनवेल जि रायगड

८१) के टी काझी (अझीम हायस्कुल)
मु पो औसा जि लातूर

८२) श्रीमती एच वाय मुल्ला
श्रीमती सुशिलादेवी हायस्कुल
सातारा–४१५००० !

८३) रफिक बागबान
चिकुमाळा रूम नं २६ फुले मार्केट मुंबई–१

७४) पापाभाई पठाण
मु पो ता अलीबाग जि. रायगड

७५) सय्यद अहमद
(बी. गु. साहित्य रत्न)
सुलतानपूरा जळगांव(जा) –४४३४०२
जि बुलढाणा

८६) तांबोळी एच बी
सनमडी हायस्कुल, सनमडी–४१६४०४
ता जत जि सांगली

८७) अॅड एम एम मुल्ला
द्वारा– क्वालिटी बेकरी, शिवाजी चौक
कोल्हापूर–४१६००२

८८) डॉ अगास्कर
प्रोफेसर ऑफ उर्दू डिपार्टमेंट, मुंबई विद्यापीठ,
कॉलनी कॅम्पस–मुंबई

८९) प्रा के ए खतीब
भूगोल विभाग प्रमुख, राजश्री छत्रपती शाहु
कॉलेज कोल्हापूर

९०) अ गनी मुजावर
५२१, न्यु पाच्छा पेठ सोलापूर–५

९१) अॅड ए के मुजावर
सोमवार पेठ कोल्हापूर

९२) प्रा जी एन नदाफ
१–२४–५५ फाजलपूरा एस. टी. कॉलनी
औरंगाबाद–४३१००१

९३) रफीक हबीब काझी
गगनबावडा जि. कोल्हापूर

९४) पठाण सादिकखान हबीबखान
मु. पो. भाळवणी ता आठरी जि बीड

९५) अमन तांबोळी
गोंदले बु।। ता माण जि सातारा

९६) हमीद तांबोळी (सर)
गोंदवले बु।। ता माण जि सातारा

९७) घुडूलाल अमीन तांबोळी
मुस्लिम नगर ता रेंदाळा ता हातकणगले
जि कोल्हापूर

९८) डॉ बानो सरताज काझी
टी व्ही. प्रक्षेपण केन्द्र जवळ सिव्हील लाईन
चन्द्रपूर–४४२४०१

९९) शेख अ रशीद दगडूभाई
मु पो घोरगांव ता श्रीगोंदा जि अहमदनगर

१००) डॉ एम एम खान
मन्डी बाजार अंबेजोगाई जि बीड

१०१) अब्दुल्ला अन्वरी
अंबेजोगाई (जि बीड)

१०२) शकील अब्दुल शेख
३२२ रेल्वे कॉलनी कुर्डूवाडी जि सोलापूर

१०३) नजीर कासीमसाब शेख
'समन प्रिंटर्स' साखर पेठ (आशिकल मैदान)
कुचन कन्या प्रशालेच्या समोर सोलापूर

१०४) शफीक शेख दै. लोकमत
एम आय डी सी जळगांव-४२५००३

१०५) रफिक हबीब काझी
द्वारा- रमेश पाटील 'ए' वार्ड लक्ष्मीतीर्थ
वसाहत (दांडगांव वाडी) ता करवीर
जि कोल्हापूर

१०६) फारूक एम कुरेशी
२७०९ डी वार्ड, कोल्हापूर

१०७) सिराज शेख
बिस्मिल्ला मंझील नाईकवाडापूरा
संगमनेर-४२२६०५ जि अहमदनगर

१०८) मेजर ए. आर मुल्ला
'करिश्मा' २८५ मगदी रोड चोर्ड रोड
बेंगलोर-४०

१०९) सिकन्दर सय्यद अमीन
१८७ खणभाग सांगली

११०) डॉ. बशारत अहमद
गाझी चौक दर्गाह रोड उस्मानाबाद
४१३५०१

१११) डॉ. एम के शाजली
कन्धार कॉलेज कन्धार जि. नांदेड

११२) जोश मोहमदाबादी
[illegible]लूर जि. नांदेड

११३) एस व्ही पठाण
रोज बाग, मौ. आजाद कॉलेज औरंगाबाद

११४) डॉ. इस्मत जावेद
मंजूरपूरा औरंगाबाद-१

११५) कॉ. शाहीर गुलाब नदाफ
मु पो इचलकरंजी जि कोल्हापूर

११६) महमद खडस
१/६ त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी, साईन
ट्रावे रोड, जुना भट्टी मुंबई-२२

११७) मिर्झा रफीक अहमद बेग
धनस जि. नागपूर

११८) कलीम खान
अर्णी जि. नागपूर

११९) मलिका अमर शेख
९४ हाजी कासम चाळ शाहीर अमर शेख मार्ग
जेकब सर्कल मुंबई-११

१२०) संपादक दै. जोहर-ए-गुफ्तार
१००२/बी फोर्ट रोड बेळगांव-५९०००१

१२१) खलील खान
'पॅरेडाईज' सहवास हॉल शेजारी विठलवाडी
रोड पुणे

१२२) मो. अन्वर सरदारखान
अकबर प्रकल्प ७६१ शुक्रवार पेठ पुणे-२

१२३) डॉ. मुहम्मद अब्दुर रहीम दळवी
गुलिस्तान २, शंकरशेठ रोड पुणे-४२

१२४) महंमद नैसर्गी
भुजबळ आळी, मु.पो. चाकण जि. पुणे

▣ अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषद. ▣

पदाधिकाऱ्यांचे – नांवे व पत्ते.

संमेलन अध्यक्ष : प्रा. फ. म. शहाजिंदे
'अश्रफ' आंतरभारती वसाहत
औरादशहाजनी जि. लातूर

परिषद अध्यक्ष : कवि ए. के. शेख
ए-२ अम्बर अपार्टमेन्ट पनवेल जि. रायगड

कार्याध्यक्ष : प्रा. फकरुद्दीन ह. बेन्नूर
सुंदरम नगरच्या पाठीमागे,
'कुदरत' बेन्नूर नगर सोलापूर

सचिव : प्रा. अजीज बा. नदाफ
शनिवार पेठ सोलापूर

उपाध्यक्ष– प्रा. मीर इस्हाक शेख
गंगाधर नगर ब्लॉक नं. २ जुने मेडिकल
कॉलेज मागे सोलापूर

„ डॉ. इक्बाल मिन्ने
'गजल' प्लॉट नं. ९ रोड नं. १०
सेक्टर १२ सिडको कॉलनी न्यू पनवेल

„ खलील मोमीन
७००, कोलांगडेवाड मनमाडा

सह सचिव : इलाही जमादर
कदम निवास, २४७/७/६ डेक्कन
कॉलेज रोड येरवडा पुणें–६

-„- आय. जी. शेख
२२२७, सी वार्ड अकबर मोहल्ला,
सोमवार पेठ कोल्हापूर

-„- विलायत पठाण ?
प्रिन्स इलेक्ट्रॉनिक सेंटर, मेन रोड
मु.पो. जामखेड जि. अहमदनगर

-„- कवि मुबारक शेख
५/६ उत्तर कसबा काळी मशिदी
जवळ सोलापूर

-„- प्रा. फातेमा मुजावर
मॉडेल कॉलनी परदेशी आळी
पनवेल जि. रायगड

खजिनदार– अ. लतीफ इ. नल्लामन्दू
५४६, साखर पेठ सोलापूर–५

◎ –कार्यकारिणी सदस्य – ◎

डॉ. के. जी पठाण
१४४ लकी चौक सोलापूर

एम. डी. शेख संपादक दै. बंधुप्रेम
फॉरेष्ट तिऱ्हेगांव सोलापूर

✓ इस्हाक अकबरसो. मनियार
११ अ/ब उत्तर कसबा सोलापूर

✓ बी. एच. करजगी
६०।५४ सिध्देश्वर पेठ सोलापूर

✓ मं. इस्हाक हुडेवाले
मुस्लिम पाच्छा पेठ मशिदी जवळ सोलापूर

✓ अन्जूम मोमीन
६५, अ. न्यू तिऱ्हेगांव फॉरेष्ट सोलापूर

एम. सी. शेख संपादक पा. विश्रामश्री
४६६, न्यू पाच्छा पेठ सोलापूर

अ. कादर मुकादम
१५ भीम प्रेरणा अलियावर जंग मार्ग
बांद्रे (इस्ट) मुंबई–५१

अमर हबीब
दै. मराठवाडा दयाराम रोड लातूर

इब्राहीम अफगान
१२९ सन्वोर कोट्टा कुन–कोलीम गोवा

बशीर अहमद बागबान
१०६ रविवार पेठ सातारा

प्रा सत्तार शेख साहब
बाजलगांव जि. बीड

एम. के. कादरी
अलिदारखाँ का मकान, वरूड वेस
मु. पो. जिंतूर जि परभणी

प्रा. शेख जाफर चांद
मु.पो. कडासाखर ता. आष्टी जि. बीड

प्रा. यूसूफ बेन्नूर
५३, भगवती कॉलनी जवाहर कॉलनी जवळ
औरंगाबाद

शौकत अकबर नदाफ
प्लॉट नं. २१ घर नं. ३८५ आर. के वसाहत
मु. पो. सांगली

सय्यद अलाऊद्दीन
द्वारा– मुसा सायकल सेंटर आष्टी जि. बिड

अलनासिर काजी संपादक आकाशगंगा
उद्यम नगर मु.पो. रत्नागिरी

डॉ. एम. ओ. शेख संपादक शोधन
१०३ चिंचबंदर रोड खडक डोंगरी मुंबई

ॲड. ए बी मुल्लां साहेब
२४४ सी वार्ड बुरुड गल्ली कोल्हापूर

★ सल्लागार मंडळ ★

डॉ. यु. म. पठाण साहेब
आनंद नगर, टाऊन हॉल जवळ औरंगाबाद

पंडित गुलाम दस्तगीर बिराजदार
संस्कृत कुटी वरळी मुंबई

ॲड. उदय टिळक
मु. पो. पेण जि. रायगड

भाई विश्वासराव फाटे
मु.पो. मोहोळ जि. सोलापूर

विलास राव सोनवणें
मु. पो. मुंबई

डॉ सुर्यनारायण रणसुभे
मु. पो. लातूर जि. लातूर



अ. भा. मुस्लिम मराठी साहित्य परिषदेच्या स्मरणिकेस हार्दीक शुभेच्छा!

- मोहोळ ग्रामपंचायत, मोहोळ -

श्री शहाजहान गुलाबसो. तांबोळी
सरपंच

श्री. प्रभाकर धोंडीराम स्वामी
उप-सरपंच

सभासद

श्री. भारत प्रभू सनगर, श्री. बाबूराव महादेव रणदिवे, श्री. रामचंद्र अनंत सगरे
श्री. वकिल बाबूलाल बागवान, श्री.गुलाबचंद फुलचंद शहा, श्री.महादेव बाबूराव मोहरे
श्री. म्हैजूलाल हब्बू शेख, श्री. पंडित हरिश्चंद्र शिंदे, श्रीमती सुलोचना रामचंद्र फडतरे
सौ. सयनबाई मनोहर देशपांडे, श्री. अशोक भाऊसो. देशमुख
श्री. दिपक चंद्रकांत गायकवाड

स्मरणिकेस आमच्या शुभेच्छा!

रजि. नं. एसयूआर/एमएचएल/आरएसआर(आर) ९०१/८४ दि. ७-१२-८४

संस्थापक-लोकनेते श्री: बाबूराव (अण्णा) पाटील अनगरकर स्थापना-डिसेंबर १९८४

मोहोळ नागरी सहकारी पत-पुरवठा संस्था मर्यादित
मोहोळ जि. सोलापूर.

सभासद संख्या-१५१० भागभांडवल रु १२,३०,०००/-
एकुण ठेवी- रु. २३,३५,०००/- एकुण कर्ज- रु. ४९,९३,०००/-
स्थापनेपासून सतत 'अ' वर्ग चालू नफा- रु. २,३८६५०/-

-० संस्थेची स्वतःचे मालकीची अदयावत इमारत ०-

श्री. कौशिक संदिपान गायकवाड
व्हा. चेअरमन

श्री. राजन बाबूराव पाटील
चेअरमन

- अखिल भारतीय मुस्लीम मराठी साहित्य परिषद -

द्वारा- कमर प्रेस, ५४६, साखर पेठ, सोलापूर (फोन नं. २८७४४)

" कार्यकारिणी आणि पदाधिकारी "

संमेलनाध्यक्ष -	प्रा. फ. मः शहाजिन्दे	औराद शहाजनी
परिषद अध्यक्ष-	कवि श्री. ए. के. शेख	पनवेल
कार्याध्यक्ष-	प्रा. फकरुद्दीन ह. बेन्नूर	सोलापूर
सचिव-	प्रा. अजीज नदाफ	सोलापूर
उपाध्यक्ष-	१) प्रा. मीरइसहाक शेख	सोलापूर
	२) डॉ. इक्बाल मिन्ने	पनवेल
	३) खलील मोमीन	मनमाड
सहसचिव-	१) इलाही जमादार	पुणे
	२) आय. जी. शेख	कोल्हापूर
	३) विलायत पठाण	अहमदनगर
	४ मुबारक शेख	सोलापूर
	५) प्रा. फातिमा मुजावर	पनवेल
खजिनदार-	अ लतीफ इ. नल्लामंदू संपादक सा. कासिद	सोलापूर
कार्यकारिणी सदस्य-	१) डॉ. के. जी. पठाण	सोलापूर

२) एम डी शेख संपादक दै. बंधुप्रेम सोलापूर ३) इसाक मनियार-सोलापूर
४) बी एच करजगी-सोलापूर ५) म इसाक हुडेवाले-सोलापूर
६) अंजूम मोमीन - सोलापूर ७) एम. सी. शेख संपादक विश्रामश्री
८) अ कादर मुकादम मुंबई ९) अमर हबीब - लातूर
१० इब्राहिम अफगान - पणजी ११) बशीरभाई बागवान - सातारा
१२) प्रा. सत्तार माजलगांव - जि, बीड १३) एम. के कादरी जिंतूर - परभणी
१४) प्रा. शेख जाफर चाँद - कडा साखर आष्टी १५) प्रा युसुफ बेन्नूर-औरंगाबाद
१६) शौकत अकबर नदाफ - सांगली १७) सय्यद अल्लाउद्दीन - आष्टी
१८) अल-नासीर काजी सपादक सा. आकाशगंगा - रत्नागिरी
१९) डॉ. एम ओ. शेख संपादक सा. शोधन-मुंबई
२०) ॲड. ए बी मुल्ला - कोल्हापूर

सल्लागार मंडळ- १) डॉ. यु. म. पठाण - औरंगाबाद
२) पं. गुलामदस्तगीर बिराजदार - मुंबई ३) ॲड. उदय टिळक - पेण
४) भाई विश्वासराव फाटे-मोहोळ जि. सोलापूर ५) विलासराव सोनवणे-मुंबई
६) डॉ. सूर्यनारायण रणसुभे - लातूर



पहिले अ. भा मुस्लीम मराठी साहित्य संमेलनांचा दीप प्रज्वलित करुन उद्घाटन करताना डॉ. यु. म. पठाण त्यांच्या शेजारी संमेलन अध्यक्ष प्रा फ. म. शाहाजिंदे, स्वागत अध्यक्ष सोलापूरचे महापौर व खासदार श्री. धर्मण्णा सादूल, प्रा. फ. ह. बेन्नूर, अ. लतीफ नल्लामंद्रू, डॉ. निर्मलकुमार फडकुले, एम. सी. शेख प्रा. अजीज नदाफ इत्यादी दिसत आहे.

० मुखपृष्ठ छपाई " समन प्रिंटर्स " सोलापूर ०